सायंदैनिक
प्राजक्त


श्रीपरशुराम


श्रीकोळेश्वर


श्रीयोगेश्वरी

भावे मित्र मंडळाचे द्वै मासिक

# ‘भावे-प्रयोग’

भावे मित्र मंडळ
एक परिवार

भावे मित्र मंडळाचे द्वैमासिक जुलै २०२५

कुलवृत्तांताचे काम सुरू होऊन दोन वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. अनेकांचे कुलवृत्तांताचे फॉर्म अजून आलेले नाहीत. सर्व भावे कुलबंधू आणि माहेरवाशिणींना विनंती की, कुलवृत्तांताचे काम लवकरात लवकर संपावे यासाठी ज्यांनी फॉर्म भरून पाठवलेले नाहीत त्यांनी ते तात्काळ भरून पाठवावेत. कुलवृत्तांत प्रकाशित करण्याचे भावे मित्र मंडळाने ठरविल्यानंतर आपले फॉर्म राहून गेल्यास नंतर ती माहिति कुलवृत्तांतात नंतर समाविष्ट करता येणार नाही याची नोंद घ्यावी. फॉर्म या पत्यावर पाठवावेत. – भावे मित्र मंडळ, द्वारा एल.डी. भावे अँड सन्स १२४४, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.

## कौशिक गोत्री, चित्पावन भावे कुलाचा कुलवृत्तांत

भावे मित्र मंडळ स्थापन होऊन नंतर २००६ मध्ये भावे मित्र मंडळाची नोंदणी झाली. भावे मित्र मंडळाचे द्वैमासिक प्रकाशित होऊ लागले. भावे मंडळींचे अनेक पत्ते मंडळाकडे उपलब्ध झाले. ह्या द्वैमासिकातून छोट्याशा चौकटीतून कुलवृत्तांतासंबंधात काम करता येईल का, अशी विचारणा सतत होत असे. प्रत्यक्षात काहीच घडत नव्हतं. मार्च २०२० मध्ये कोरोनामुळे लॉकडाऊन आलं. त्यावेळेला मी असा विचार केला की १९९१ सालचा कुलवृत्तांत जर पुन्हा जसाच्या तसा टाईप करून ठेवला तर नंतर त्यामध्ये नवीन आलेली माहिती आपल्याला घेता येईल. माझा पूर्वी प्रकाशनाचा व्यवसाय असल्याने व दर दोन महिन्याने प्रकाशित होणारे आपले नियतकालिकाचे काम मी माझ्याकडेच करीत असल्याने कुलवृत्तांतासाठी काय करावे लागेल याची मला कल्पना आली व मी कुलवृत्तांताचे काम हळूहळू सुरू केले. आत्ता कुलवृत्तांताच्या माहितीचा ६० ते ७० टक्के भाग पूर्ण झाला आहे. आता नवीन माहिती येणे आवश्यक आहे. त्यासाठी एक फॉर्म तयार केला आहे. तो फॉर्म पान क्रमांक ३ वर छापला आहे. - अभय शंकर भावे.

### भावे कुलवृत्तांताचा फॉर्म भरताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे ..

१) प्राजक्तच्या या अंकात दिलेला फॉर्म सर्वांनी भरून पाठवायचा आहे. २) सर्वप्रथम कुलवृत्तांतातील आपल्या घराण्याच्या नोंदी पहाव्यात. कुलवृत्तांतात नाव सापडत नसेल तर आपल्या वडिलांचे, आजोबांचे व पणजोबांचे पूर्ण नाव अभय शंकर भावे यांना कळवलेत तर ते कुलवृत्तांतातील त्या पानाचा फोटो पाठवतील. ३) आपल्या घरातील कोणत्या व्यक्तीपर्यंतची माहिती आली आहे, ते पहावे. ज्या सदस्यांबद्दल ‘माहिती उपलब्ध नाही’ असे लिहिले आहे, त्यांचीही माहिती वेगळ्या फॉर्ममध्ये लिहून पाठवायची आहे. ४) १९९१ साली कुलवृत्तांत छापल्यानंतर आपल्या घरात झालेली लग्नं, नवीन जन्मलेले सदस्य, अगदी तान्ह्या मुलांची सुद्धा माहिती, तसेच घरातील सदस्यांचे झालेले मृत्यू, यांची माहिती भरायची आहे. १९९१ सालानंतर आपल्या आयुष्यातले बदल जसे नोकरी, रिटायरमेंट याबद्दलही माहिती लिहायची आहे. ५) घरातल्या प्रत्येक व्यक्तीचा वेगळा फॉर्म भरायचा आहे. कारण त्यात प्रत्येकाची जन्मतारीख, शिक्षण, प्रत्येकाचा व्यवसाय नोकरी याची वेगळी वेगळी माहिती भरायची आहे. त्यासाठी प्राजक्तमध्ये आलेल्या फॉर्मच्या, घरातील संख्येप्रमाणे झेरॉक्स काढाव्यात. ६) आपल्या मुलींची लग्ने झाली असल्यास त्यांचं आधीचं नाव, आत्ताचं नाव, शिक्षण, नोकरी आणि लग्नानंतरचा तिचा पत्ता, याबद्दलची माहिती वेगळ्या फॉर्मवर द्यायची आहे. ७) आईवडील हयात नसल्यास बहिणींची किंवा आत्यांची माहिती भावांनी वेगवेगळ्या फॉर्ममध्ये लिहून पाठवावी. ८) भावे घराण्यातील स्त्रियांनी/म्हणजे सासू आणि सुनांनी, फॉर्म भरताना, घराणे लिहावे, कुलवृत्तांतातील पान क्रमांक लिहावा. त्यानंतर पणजोबांचे, आजोबांचे नाव आणि व्यक्तीचे नाव, इथे काहीच लिहायचे नाही. ‘पत्नीचे नाव’ पासून त्यांनी आपली माहिती लिहावी. त्यात, स्वत:च्या नावानंतर माहेरचे पूर्ण नाव लिहावे व पुढील माहिती भरावी. ९) हयात नसलेल्यांच्या मृत्युचे दिनांकही द्यायचे आहेत. आपापले फॉर्म भरून झाल्यानंतर, आपल्या नातेवाईकांना, तसेच आपल्या जवळपास रहाणाऱ्या भाव्यांनाही याची माहिती द्यावी आणि लवकरात लवकर फॉर्म भरून पाठवण्यास उद्युक्त करावे.

यासंदर्भात कुठलीही शंका असल्यास श्री. अभय शंकर भावे ९४२२३०६०३३/७०२०६४५८९२ यांच्याशी संपर्क करावा. फॉर्म पोस्टाने खालील पत्त्यावर पाठवावेत. भावे मित्र मंडळ, द्वारा एल.डी.भावे अँड सन्स, १२४४, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.

ई-मेलने फॉर्म पाठवायचे असतील तर bhave1956@gmail.com या ई-मेल वर पाठवावेत.

# संपादकीय

**भावे कुलवृत्तांताचे काम सुरू होऊन आता दोन वर्ष झाली. कुलवृत्तांताचे फॉर्म भरून द्या अशी विनंती केल्यावर काहीजण कधीपर्यंत फॉर्म भरून दिले तर चालतील असे विचारतात. याला मुदत नसली तरी हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी फॉर्म तात्काळ भरावेत.**

**अद्याप अनेक भावे कुटुंबियांचे कुलवृत्तांताचे फॉर्म येणे शिल्लक आहे. आमची माहिती मागच्या कुलवृत्तांतात आहे. आता पुन्हा फॉर्म कशाला भरून हवेत? असे प्रश्न विचारले जातात. १९९१ सालच्या नंतर त्या माहितीत अनेक बदल झाले असणारच ना? म्हणून नव्याने फॉर्म भरणे आवश्यक आहे.**

**आपले घराणे कोणते? कुलवृत्तांतात नाव आहे की नाही? याचा विचार न करता फॉर्म भरून पाठवावेत, घराणे शोधण्याचे काम कुलवृत्तांताचे काम करणारे करतीलच. भावे कुलवृत्तांताचे फॉर्म भरून पाठवण्यासाठी तासाभराचाच अवधी लागतो, त्यामुळे वेळ काढून कुलवृत्तांताचे फॉर्म भरून पाठवावेत. सर्वांनी आपले फॉर्म भरताना आपल्या मागील पिढीचेही अपडेटस भरून पाठवावेत. तसेच प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्र फॉर्म भरावा म्हणजे कुलवृत्तांतात सर्व माहिती समाविष्ट होईल. कुलवृत्तांताचा फॉर्म भरण्यासंबंधीची अधिक माहिती पान क्र १ वर व भरून द्यायचा फॉर्म पान क्र ३ वर आहे.**

Unsung Heros गाऊ त्यांना आरती! अनेक अलौकिक, दुर्मिळ गुणवत्ता असलेल्या भावे कुलातील व्यक्ती केवळ प्रसिद्धीचे कोंदण न लाभल्यामुळे विस्मृतीत गेल्या. अशा व्यक्तिमत्त्वांचा परिचय करून देणारे हे सदर आहे. या लेखमालिकेतून भावे कुलात आपल्या कार्यकर्तृत्वाने विविध क्षेत्रात ज्यांनी आपला ठसा उमटवला अशा व्यक्तींची माहिती देण्याच्या या उपक्रमाला वाचकांची पसंती असल्याचे त्यांच्या येणाऱ्या प्रतिक्रियांमुळे लक्षात येते आहे. अशा व्यक्तींची माहिती आम्हास लिहून पाठवावी, म्हणजे ती पुढील अंकांमधून प्रकाशित करता येईल व कुलवृत्तांतातही समाविष्ट करता येईल.

'उद्योजक म्हणून घडताना' ही भाव्यांमधील व्यावसायिकांनी आपण व्यवसाय का करू लागलो, त्या मागची प्रेरणा कोणाची, व्यवसाय करताना अडचणी काय आल्या अशा अनुभव कथनाची ही लेखमाला आहे. आपले व्यावसायिक अनुभव मराठी, इंग्रजी, हिंदी या कोणत्याही भाषेतून साधारण १००० ते १२०० शब्दांत लिहून bhave1956@gmail.com या मेलवर पाठवावेत. व्यवसायात नव्याने येणाऱ्या भावी पिढीसाठी हे अनुभव निश्चित मार्गदर्शक ठरतील. अनेकांना लिखाणाची सवय नसते अशांनी ऑडियो रेकॉर्डिंग करून ते पाठविल्यास त्यावरूनही लेख तयार करून घेता येईल.

'भावे-प्रयोग'या प्राजक्ततर्फे प्रकाशित होणाऱ्या अंकात आपला सहभाग लिखाणाच्या रूपाने हवा आहे. आपल्यात सिद्धहस्त लेखक आणि कवी आहेत, त्यांचेही साहित्य प्रकाशित करायची संधी मिळावी असे आवाहन याद्वारे मी करीत आहे. अनेकांना मी भेटत असतो, त्यावेळी त्यांना तुम्ही तुमच्या पद्धतीने लिहून द्या, त्यावर संपादकीय संस्कार करून, लिखाण व्यवस्थित करून घेईन असे मी सांगत असतो. त्यामुळे आपल्याला सुचलेल्या विषयावरील लिखाण जरूर पाठवावे, ही विनंती.

**अभय शंकर भावे**
७०२०६४५८९२/९४२२३०६०३३ Whats App

**'भावे मित्र मंडळ-एक परिवार'** ही संस्था २००६ मध्ये नोंदणीकृत झाली असून त्याचा नोंदणी क्रमांक MAH/357/2006 हा आहे.

## अंकाबद्दल प्रतिक्रिया

अभयजी नमस्कार,

प्राजक्तचा अंक पोचला. त्यातील 'गाऊ त्यांना आरती' हा सुवर्णा भावे-जोशी यांनी लिहिलेला वसंत गजानन भावे शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळालेले त्यांचे वडील यांच्या संबंधी लेख खरंच मनाला भावून गेला. आपली माणसं शेवटपर्यंत कशी आपल्या प्रिन्सिपलला चिकटून असत याचे एक चांगले उदाहरण डोळ्यांसमोर ठेवले आहे. आपल्यातल्या कोणाला शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळाली हे पहिल्यांदाच कळले, वाचून आनंद झाला. बाकी लेख सुद्धा खूपच सुरेख आहेत.

**विनायक अण्णाजी भावे, पुणे.**

---

प्राजक्तचा १४ मे चा अंक मिळाला. अंकामधील लेख खूपच चांगले व माहितीपूर्ण असतात. काश्मीर पर्यटनात ठरावीकच नेहमीची स्थळे दाखविली जातात त्यात आता आदि शंकराचार्यांचे मंदिर दाखविण्यास सांगायला हवे. या मंदिराची माहिती इतिहासाच्या दृष्टीकोनातून खूप छान दिली आहे.

'सायबर सुरक्षितता तुमच्या हाती' हा लेख सिनियर सिटीझन्सच्या दृष्टीने खूपच महत्त्वपूर्ण आहे. मोबाईल वापरताना किंवा व्यवहार करताना कशी काळजी घ्यायची हे सोप्या भाषेत सांगितले आहे.

शिक्षकाने कसे असावे हे 'गाऊ त्यांना आरती' या लेखात वसंत गजानन भावे यांच्या उदाहरणावरून समजते. मोटर न्युरॉन डिसीज या दुर्मिळ आजाराबद्दल माहिती मिळाली, डॉक्टर पूर्ण माहिती सांगत नाहीत.

नेत्रदानाबद्दल खूप सखोल माहिती मिळाली पण मोतीबिंदूचे ऑपरेशन झालेल्यांना नेत्रदान करता येते का?

विक्रम विनय भावे यांना देव, देश आणि धर्म यांचे कार्य करताना जे काही भोगावे लागले म्हणूनच असे कार्य करायला चांगल्या घरातील मुले पुढे येत नाहीत.

बाओबाब या दीर्घकाळ जगणाऱ्या पानझडीच्या वृक्षाबद्दल खूप छान माहिती मिळाली. झाडाचा वैज्ञानिक उपयोग व अनेक नावे समजली. राणीच्या बागेत दर्शनी असलेल्या झाडाचे आवर्जून निरीक्षण करीन. मेहनत घेऊन सर्व लेख लिहिलेल्या लेखकांचे अभिनंदन व धन्यवाद!

**शामला शशिकांत भावे, ठाणे.**

---

नेत्रदानाबद्दल खूप सखोल माहिती मिळाली पण मोतीबिंदूचे ऑपरेशन झालेल्यांना नेत्रदान करता येते का? या प्रश्नाचे डॉ. अरुंधती भावे यांनी उत्तर दिले आहे की असे नेत्रदान डोळ्यांची पूर्ण तपासणी केल्यानंतर ते डोळे नेत्रदानास योग्य असतील तर नेत्रदान करता येते आणि जर ते डोळे प्रत्यारोपणास योग्य नसतील तर ते संशोधनासाठी वापरता येतात.

**पोस्टाने पाठवलेला अंक न मिळण्याचे प्रमाण भरपूर आहे. अंक ई मेलने पाठविण्याचा प्रयोग चांगलाच यशस्वी ठरतो आहे. असाही एक सूर ऐकू आला की व्हॉटस् ॲपवर अंक पाठवा, पण ते शक्य नाहीये हे लक्षात घेऊनच ई-मेलचा मार्ग निवडला आहे. त्यासाठी कुटुंबातील सर्वांचे मेल ॲड्रेस पाठवावेत. अजूनही अनेकांचे मेल ॲड्रेस उपलब्ध झालेले नाहीत, तरी आपले मेल ॲड्रेस bhave1956@gmail.com या मेलवर कळवावेत म्हणजे पुढील अंक मेलनेही पाठवता येतील. मेल करताना आपल्या संपूर्ण नावासह पूर्ण पत्ता व फोन नंबरही कळवावा.**

# कौशिक गोत्री, चित्पावन, भावे कुलाच्या कुलवृत्तांतासाठी फॉर्म

**हा फॉर्म कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने किंवा प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्रपणे भरायचा आहे.**
**विवाहित स्त्रियांनी फॉर्म भरताना आपल्या पूर्ण नावासह पूर्वीचेही नाव लिहावे.**

कुलवृत्तांताप्रमाणे घराणे : .............................. कुलवृत्तांतातील पान क्रमांक .......................
(घराणे व पान क्रमांक माहिती नसल्यास किंवा सापडला नाही तर तसे लिहावे.)
मूळगाव : ..................
पणजोबांचे संपूर्ण नाव : .............................. आजोबांचे संपूर्ण नाव : ............................
वडिलांचे संपूर्ण नाव : ..........................................................................
व्यक्तीचे संपूर्ण नाव : ..........................................................................
पत्नीचे संपूर्ण नाव : ............................................................................
मुलगे व मुलींची संपूर्ण नावे : ................................................................
..........................................................................................
पत्ता : ..................................................................................
..........................................................................................
शहर/गाव ............................ पिन कोड क्र. ............................
जन्म दिनांक ......................... शिक्षण : ........................................................
फोन नं. एस.टी.डी कोड सहित. ...................... मोबाईल नं. : ...................................
व्हॉटस्अॅप नं. :.............................. ई-मेल : ................................................
नोकरी/व्यवसायाबद्दल व आपल्या आयुष्यातील विविध प्रगतीविषयी माहिती द्यावी.
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................

स्वाक्षरी

# ये कश्मीर है - लेख क्र. ४
# भव्य दिव्य मार्तंड सूर्य मंदिर

© डॉ. सरिता विनय भावे, मुंबई.
छायाचित्र क्रेडिट
डॉ. सरिता विनय भावे, वर्षा, संदर्भ.

काश्मीर पर्यटनात नेहमीचे सोनमर्ग, गुलमर्ग, पहलगाम सर्वच पर्यटक करतात आणि ते तसे करायलाही हवे. पण काश्मीरच्या या 'आऊट ऑफ धिस वर्ल्ड' सौंदर्याची आपल्या डोळ्यांवर, आपल्या अंतरात्म्यावर इतकी नशा चढते की काश्मीरबद्दल इतर काही माहिती करून घ्यावी ही चाहच आपल्या मनात निर्माण होत नाही. म्हणूनच जानेवारी २०२५ पासून आपण काश्मीरच्या काही 'ऑफ बीट' पर्यटन स्थळांची रोचक माहिती देणारी लेखमाला सुरू केली आहे. त्या मालिकेतील हा चौथा लेख!

कुणी मनातून कितीही खवचट हसले अथवा डोक्याला हात मारून घेतला तरी आँधी (१९७५) चित्रपटातील 'तेरे बिना जिंदगी से कोई शिकवा तो नहीं....' या गीतात दिसणारे मंदिर म्हणजे मार्तंड सूर्य मंदिर हीच माझी त्याबद्दलची पहिलीवहिली ओळख आहे! हैदर (२०१३) चित्रपटातील 'बिस्मिल...' गाण्याच्या पार्श्वभूमीवर सुद्धा हे मंदिर दिसले होते. नजीकच्या काळात 'चित्रहार' पाहताना 'चला भी आ, आजा रसिया...' (चित्रपट - मन की आँखें,१९७०) या गाण्यातील पहिल्या कडव्यात पार्श्वभूमीला हेच मंदिर आहे हे मला ओळखू आले. तेव्हा हिंदी चित्रपटसृष्टीतील मंडळींनासुद्धा एवढी भुरळ घालू शकणाऱ्या या मंदिरात इतके विशेष काय असावे या प्रश्नाचा भुंगा माझे चित्त पोखरायला लागला, आणि भविष्यात काश्मीर ट्रीप केली की हे मंदिर प्रत्यक्ष बघूनच यायचे याची मी मनात खूणगाठ बांधली!

चला तर मग, मंदिराचे दर्शन घेण्याअगोदर 'मार्तंड' शब्दाची व्युत्पत्ती जाणून घेऊया! या मालिकेतील पहिल्या लेखात आपण वाचले होते की कश्यप ऋषींनी विशाल 'सतीसर'(सर म्हणजे सरोवर) च्या पाण्याचा निचरा करून वस्ती करण्यायोग्य काश्मीर खोऱ्याची निर्मिती केली होती. या कश्यप ऋषींच्या विविध भार्यांबद्दल उपलब्ध असलेली माहिती बरीच विसंगत असली तरी त्यांनी दक्ष प्रजापतीच्या अदिति या मुली पासून देव, आदित्य; दिति पासून दैत्य; कद्रू पासून नाग; विनता पासून अरुण (सूर्याचा सारथी), गरुड (पक्षी) इ. अशी सर्व सजीव सृष्टीची निर्मिती केली असे सामान्यत: मानले जाते. स्थानिक दंतकथेनुसार अदितीने बारा आदित्य/सूर्य यांना अंड्याच्या रूपात जन्म दिला होता. परंतु तेराव्या सूर्याच्या वेळी गर्भवती असताना, आपल्या पतीशी वाद झाल्यावर, रागाच्या भरात, दिवस पूर्ण भरण्याअगोदरच तिने ते अंडे या सतीसरात टाकून दिले. हा तेरावा सूर्य या सरोवरात बऱ्याच कालावधीसाठी सुप्तावस्थेत पडून राहिला. जलोद्भवाचा संहार करण्यासाठी सतीसराचा निचरा करण्यात आल्यावर, तळाशी असलेले हे अंडे कश्यप ऋषींच्या नजरेस पडले. तेव्हा त्यांना फार पूर्वी टाकून दिलेल्या, आपल्या 'मार्त → मृत+अंड' (मृत/जीव नसलेले अंडे) म्हणजेच 'मार्तंड' या पुत्राची आठवण झाली! त्यांनी त्याला हातात धरण्याचा प्रयत्न करताच त्यांच्या मुलाने त्यांना याचे भयंकर परिणाम भोगावे लागतील असा इशारा दिला. कश्यप ऋषींना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले आणि त्यांनी मार्ग दाखवण्यासाठी ब्रह्मा, विष्णु, महेश आणि देवी पार्वतीची करुणा भाकली. तेव्हा माता पार्वतीच्या सांगण्यावरून श्रीविष्णु यांनी आपल्या सुदर्शन चक्राने त्या अंड्याचे दोन भाग केले. या भागांचे 'विमला' आणि 'कमला' नावाच्या झऱ्यांमध्ये रूपांतर झाले आणि या प्रक्रियेत तुटलेल्या अंड्यातून उत्सर्जित होणारा दिव्य प्रकाश 'मार्तंड' म्हणून ओळखला जाऊ लागला.



KASHMIR.
General View of Temple and Enclosure of Marttand or the Sun, near Bhawan. Probable date of Temple A.D. 490-555. Probable date of Colonnade A.D. 693-729. No. 10. '68




Fig. 1. Kashmir : Temple of the Sun, Martand ; 8th century A.D.

वैदिक काळात शेती करणाऱ्या समुदायांनी प्रकाश आणि ऊर्जा देणाऱ्या सूर्याचे स्थान देवतांमध्ये सर्वोच्च मानले होते. निर्गुण निराकार रूपात पूजला जाणारा सूर्य नंतर पौराणिक काळात मात्र श्रीविष्णुच्या सगुण साकार स्वरूपात पूजला जाऊ लागला. परकीय संस्कृती/परंपरांशी भारतीय संस्कृतीचा परिचय झाल्यावर त्यांचा सुद्धा प्रभाव भारतीय विचारसरणीवर पडला. या सामाजिक अभिसरणामुळे कुशाण काळात, मुख्यत्वे करून इराण देशातून हद्दपार केलेल्या सौर संप्रदायाने, काश्मीरमध्ये (पर्यायाने भारतात) शिरकाव केल्यावर, भारतीय समाजाने त्यांना सामावून घेतले. त्यांच्या प्रभावामुळे घट्ट कोट आणि उंच बूट घालणाऱ्या सूर्यप्रतिमेची उपासना इथे सुरू झाली. सूर्याला समर्पित अनेक मंदिरे भारतभर आढळतात. त्यात गुजरात राज्यातील मेहसाणा जिल्ह्यातील 'मोढेरा' गावातील ११ व्या शतकातील चालुक्य राजवटीत उभारलेले सूर्य मंदिर आणि ओरिसा राज्यातील पुरी जिल्ह्यातील १३ व्या शतकातील पूर्वगंगा राजवटीत उभारलेले 'कोणार्क' येथील सूर्य मंदिर सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. काश्मीर मधील श्रीनगर-कन्याकुमारी राष्ट्रीय महामार्गावर (NH ४४) अनंतनाग जिल्ह्यातील अनंतनाग गावापासून (श्रीनगर पासून ६० कि. मी. अंतर) ८ कि. मी. अंतरावर असलेल्या मट्टन गावात मार्तंड सूर्य मंदिर आहे. कल्हणच्या 'राजतरंगिणी'त 'मार्तंडक' मंदिराचा 'सिंहरोत्मी' गावात जीर्णोद्धार केला असा उल्लेख येतो, यावरून उपरोक्त मंदिर 'मार्तंड' म्हणजेच संस्कृत भाषेतील सूर्याचे आहे हे निश्चित होते. 'मार्तंड' या नावाचाच नंतर 'मट्टन' हा अपभ्रंश झाला असावा. मट्टन येथील मंदिर सूर्याला अथवा सूर्य स्वरुपातील श्रीविष्णुला समर्पित आहे.

काश्मीरमधील विद्यमान अवशेषांपैकी स्थान आणि आकारमानानुसार सर्वात भव्य भग्नावशेष मार्तंड सूर्य मंदिराचे आहेत. त्याचे अलौकिक सौंदर्य आणि स्थापत्यातील वैशिष्ट्यपूर्ण ठाशीवपणा इतर कुठल्याही प्राचीन वास्तुकलेपेक्षा कमी नाही, असे सर्व पुरातत्ववेत्त्यांना एकदिलाने वाटते. किंबहुना या मंदिराच्या एकमेवाद्वितीय अशा 'लोकेशन' मुळे तर देशी - विदेशी अभ्यासक अक्षरश: भारावून गेलेले दिसतात. मंदिर ज्यावर स्थित आहे ते मट्टन करेवा (पठार) समुद्रसपाटीपासून साधारण ५८०० फुटांवर




(१७६८ मीटर) असल्याने त्या उंचीवरून निळ्याभोर विस्तीर्ण आसमंतात शिरलेल्या मंदिराच्या स्तंभांच्या, महिरपदार कमानींच्या तसेच तिथून होणाऱ्या संपूर्ण काश्मीर खोऱ्याच्या बर्फाच्छादित पर्वतरांगांनी वेढलेल्या, देवदारची घनदाट जंगले व हिरव्या कुरणांनी सजलेल्या, दुधाळ नदी – झऱ्यांची खळखळती किनार लाभलेल्या, 'भूतलावरील स्वर्गच जणू' अशा अनुभूतीने त्यांची तशी अवस्था झाल्यास यात नवल ते काय?! त्यांच्या चर्मचक्षुंना झालेले मंदिराचे प्रथम दर्शन ओसाड, ढासळलेल्या, भग्नावस्थेतील जरी असले तरी त्यांच्या भावचक्षुंना मंदिराच्या बांधकामाच्या आकारमानातील 'भव्यत्व' आणि त्याच्या संकल्पनेमागचे 'दिव्यत्व' जाणवल्याशिवाय राहिले नाही आणि तेच त्यांच्या लिखाणात उमटलेले दिसते.

इतके सुंदर आणि विशाल देवालय उभारणे हे सामान्य मानवाला शक्यच नाही अशी धारणा असलेले तेथील ब्राह्मण आणि मट्टन गावातील स्थानिक रहिवासी त्याला 'पांडवों की लारी', 'पांडू लैदान' अथवा 'पांडवांचे घर' असे संबोधत. प्रागैतिहासिक काळापासून एक महत्त्वपूर्ण हिंदू केंद्र असलेल्या काश्मीरची वास्तुकला वेगळीच असून त्याच्या स्थापत्यकलेच्या वैशिष्ट्यांमध्ये पिरॅमिडल शिखर, त्रिदलीय कमानी आणि विस्तृत आंतरस्तंभ यांचा समावेश होतो. आता अस्तित्वात नसले तरी याही मंदिराचे शिखर लाकडी आणि पिरॅमिडल आकाराचे असावेत असे तज्ज्ञांना वाटते. त्रिदलीय कमानीमागची संकल्पना निर्वाण प्राप्त झालेल्या बुद्धाच्या किंवा हिंदू धर्मातील संतांच्या डोक्याभोवती कमळ, पिंपळ आणि वटपत्राच्या आकारातील जे तेजोवलय किंवा प्रभामंडल दर्शवले जाते त्यावरून घेतली असावी. पुरातत्वशास्त्रीय निष्कर्षांवरून, स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने हे मंदिर काश्मीरी, गांधारन, गुप्त आणि चिनी वास्तुशिल्पाचे मिश्रण आहे. पायापासून शिखरापर्यंत एकच साहित्य वापरल्या गेलेल्या या रचना 'शुद्ध' अशा आहेत. स्थानिक पातळीवर आढळणाऱ्या, किंचित निळसर-राखाडी छटा असलेल्या, सच्छिद्र, चुनखडीच्या, 'देवरी' प्रकाराच्या दगडात हे मंदिर बांधलेले आहे. हे भलेमोठे दगड वाहून नेताना हत्तींचा वापर केला होता हे ज्ञात असले तरी प्रत्यक्ष बांधकामाच्या वेळी ते वर कसे उचलले असतील हा प्रश्न मनाला नक्कीच भेडसावतो!



एका विशाल, आयताकृती, मोकळ्या प्रांगणाच्या मध्यवर्ती स्थानी स्थित असलेले हे मंदिर काश्मीरमधील सर्वांत मोठ्या, वैशिष्ट्यपूर्ण आणि



आकर्षक स्तंभावलींनी (colonnade, peristyle) वेढलेले आहे. या सहाफुटी तटबंदीसारख्या रचनेवर उभारलेले, वळसेदार भव्य स्तंभ लक्षवेधक वाटतात. मुख्य मंदिरापासून काही फुट अंतरावर साधारण चौकोनाकृती जागेत वर छत असलेले, प्रांगणाभिमुख असणारे, नक्षीचे, वळसेदार, खाचायुक्त, महिरपदार असे ८४ स्तंभ उभारले आहेत. एका स्पष्टीकरणानुसार हिंदूंमधील प्रसिद्ध चौरासी (८४) ही संख्या, आठवड्यातील दिवसांची संख्या (किंवा सूर्याचा सप्तरंगी-सप्तप्रकाश, ७) आणि राशीचक्रातील राशींची संख्या (१२); किंवा सूर्याचे ७ घोडे आणि त्याच्या रथचक्रातील १२ आऱ्या, यांच्या गुणाकारातून तयार होते आणि ती विशेषत: सूर्याला सूचित करते. म्हणजे केवळ मुख्य मंदिरच नव्हे तर त्याचे प्रांगणसुद्धा सूर्याला समर्पित आहे असे या ठिकाणी म्हणता येते. मुख्य मंदिरासमोर पाण्याचे एक चौरस कुंड असून या परिसराच्या जवळून वाहणाऱ्या 'लंबोदरी' (आताची लीडर) नदीचे पाणी प्राचीनकाळी इथे पाटाद्वारे (कॅनॉल) आणले जात असावे असे अभ्यासकांचे मत आहे.



मार्तंड सूर्य मंदिराच्या कालखंडाबद्दल अभ्यासकांमध्ये संभ्रम असला तरी कल्हणच्या 'राजतरंगिणी' मध्ये नमूद केल्यानुसार कर्कोट (कर्कोटक नागापासून उत्पन्न झालेल्या) राजघराण्यातील तिसरा शासक ललितादित्य मुक्तापीडच्या कारकिर्दीत (इ. स. ७२४ – इ. स. ७६१), साधारण आठव्या शतकाच्या मध्यात 'स्तंभावलीं'ची निर्मिती केली गेली हे सर्वांनी मान्य केले आहे. एकोणिसाव्या शतकात उत्खननाच्यावेळी मुख्य मंदिराजवळ राणादित्य राजाने (साधारण इ. स. ५००) बांधलेले उत्तरेकडील 'राणापूरस्वामी' (राणेश) आणि त्याची राणी अमृतप्रभाने बांधलेले दक्षिणेकडील 'अमृतेश्वर', अशी महादेवाला समर्पित दोन लहान मंदिरे सापडली होती. यावरून तज्ज्ञांनी असा निष्कर्ष काढला की ललितादित्याच्या कालावधीत मुख्य मंदिर उभारताना (की जीर्णोद्धार करताना?) या जुन्या मंदिरांना जमीनदोस्त न करता त्यांना सुद्धा सामावून घेतले असेल. तसेच मंदिराच्या बांधकामातील चुन्याचा (सीमेंटसारखा) उल्लेखनीय वापरसुद्धा ललितादित्याच्या कालावधीतील स्थलांतरित बायझंटाईन वास्तुविशारदांच्या संभाव्य सहभागाला दुजोरा देतो.


हिंदू मंदिरांच्या स्थापत्यशास्त्राच्या तत्त्वांचे पालन करून उभारलेल्या या मंदिराचे पहिले प्रवेशद्वार पश्चिमाभिमुख असून ते मुख्य मंदिराच्या रुंदीला प्रतिबिंबितकरून भव्यतेची भावना देते. प्रवेशद्वाराच्या भिंती वेलबुट्टी, हंसांची जोडी तसेच विष्णु आणि मानवी शिल्पाकृतींनी सुशोभित केल्या आहेत. मध्यवर्ती असलेले आयताकृती देवस्थान विस्तृत अर्धमंडप,

अंतराळ आणि गर्भगृहाने युक्त आहे. सर्वात बाहेरील खुला अर्धमंडप कलाकुसरीने युक्त असून मध्यभागी असलेले अंतराळ सुद्धा त्याच शैलीत सजलेले आहे. मुख्य मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला त्रिदलीय कोनाडे असून त्या प्रत्येकात हिंदू देवतेची मूर्ती असावी. इथल्या उत्खननात सापडलेली ब्रह्मा-विष्णु-शिव या त्रिकुटाची मूर्ती सूर्यदेवतेचे सकाळी ब्रह्मा किंवा निर्माता; दुपारी विष्णु अथवा रक्षक आणि संध्याकाळी शिव किंवा विनाशक रूप निर्देशित करत असावी असा निष्कर्ष कनिंगहॅम यांनी सर विल्यम जोन्सच्या यांच्या 'द मिस्टिक ऑर्ब ट्रायफॉर्म' या सूर्याला समर्पित स्तोत्रावरून मांडला होता.




गर्भगृह अतिशय साधे असून ते तीन बाजूंनी बंदिस्त आहे. सध्या तिथे मुस्लिमांच्या विध्वंसक आवेशातून सुटलेल्या पवित्र प्रतिमेचे कोणतेही अवशेष शिल्लक नाहीत. परंतु एकेकाळी इथे रथावर आरूढ असलेल्या 'मार्तंड' सूर्यदेवतेची मूर्ती असावी. अयोध्येच्या उत्खननात (१९ व्या शतकातील) एका अतिशय प्राचीन तांब्याच्या शिक्क्यावर आढळलेल्या रेखांकनानुसार, तसेच वेदांत नमूद केल्याप्रमाणे त्याच्या रथाला चार पिवळे अथवा अर्वाचीन मान्यतेनुसार सात हिरवे अश्व असावेत. गर्भगृह दिवसा तिन्ही बाजूंच्या बंदिस्त द्वारमार्गांवरील अर्धवर्तुळाकार गवाक्षातून प्रकाश झिरपून उजळत असावे. तर सायंकाळी, मंदिराचे प्रवेशद्वार पश्चिमाभिमुख असल्याने, गर्भगृहातील तेजस्वी सूर्यप्रतिमा वास्तविक सूर्याच्या मावळतीच्या किरणांनी न्हाऊन अजूनच झळाळून जात असावी. संदर्भातील हे वर्णन वाचताना त्या दृश्याच्या अफाट व्याप्तीने, त्याच्या उदात्ततेने माझे डोळे भरून आले. खरोखरच इतक्या प्राचीन काळात (साधारण साडे बाराशे वर्षांपूर्वी!) सुद्धा ज्या कुशलतेने मंदिराच्या एकूण बांधणीत भोवतालची नैसर्गिक मांडणी, तेव्हा उपलब्ध असलेले वैदिक ज्ञान आणि वास्तुशास्त्र विषयक साहित्य (लिटरेचर) यांचे चपखल समायोजन केले होते, ते जाणवून त्या स्थपतींची असामान्य कल्पनाशक्ती, शिल्पकारांचे अपरिमित कौशल्य आणि राज्यकर्त्यांची असीम भक्ती व औदार्य यांच्यापुढे आपण नतमस्तक होतो.

गर्भगृहाच्या उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे प्रत्येकी एक कक्ष आहे.



संभाव्य सूर्य (अरूण) अथवा विष्णु मूर्ती



येथील तीन मुखे व आठ हस्त असलेल्या वैकुंठ स्वरूपातील श्रीविष्णु आणि रथाच्या घोड्यांचे लगाम हाती घेतलेल्या सूर्यदेवता (की अरुण?) यांची उध्वस्त झालेली शिल्पे तसेच मंदिराच्या बाहेरील भिंतीवरील लक्ष्मी, कुबेर व ओळख न पटलेल्या देवतांची शिल्पे उल्लेखनीय आहेत. काश्मीरमधील स्तंभांचे स्थापत्य आणि कलासौंदर्य इतर भारतीय मंदिरांतील स्तंभांपेक्षा निराळे आहे असे मानले जाते. त्याची प्रचिती इथल्या देवकोष्ठांच्या स्तंभांच्या उत्कृष्ट कोरीव कामावरून येते. डाव्या भिंतीवर आपले वाहन मगरीवर उभी असलेली देवी गंगा नदीची प्रतिमा असून तिने शंकूच्या आकाराचा दुहेरी मुकुट परिधान केलेला आहे. तिच्या उजवीकडे एका सेविकेने तिच्या मस्तकावर छत्र धरले आहे, तर तिच्या डावीकडे 'चौरी' धारक आहे. देवी गंगेने डाव्या हातात पाण्याचा घडा आणि उजव्या हातात कमळाच्या फुलाचा देठ ही तिची नेहमीची प्रतीके धरली आहेत. विरुद्ध भिंतीवर कासव या आपल्या वाहनासमवेत असलेल्या देवी यमुना नदीची प्रतिमा आहे.



गंगा नदी यमुना नदी

मुख्य मंदिराच्या मागील बाजूस डाव्या कोपऱ्यात असलेल्या मंदिरात सहा ओळींचा (कदाचित शारदा लिपीतील) शिलालेख दिसतो. याच बाजूला कोरलेल्या असंख्य शिल्पांत बासरी वादन करणारा श्रीकृष्ण सहज लक्षात आला तरी इतर शिल्पांचा मात्र ओळखू येण्यापलीकडे विनाश झालेला दिसतो. मंदिर परिसरात एकूणच इतस्तत: विखुरलेले, भग्न शिल्पपाषाण बघून काळजात एक बोचरी कळ उठते.



मध्यवर्ती इमारत आणि पहिले प्रवेशद्वार यांच्या प्रचंड आकारमानाला विरोधाभास म्हणून या दोघांच्या मध्ये एका बाजूला योजलेली आणि छाया -प्रकाशाच्या वेगाने बदलत असणाऱ्या खेळाला अधोरेखित करणारी महिरपदारस्तंभांची रचना या सर्वच आसमंताला एक समतोल साधून देते. मुख्य

मंदिराची इमारत मध्यम आकाराची असूनही मंदिराचे संपूर्ण बाह्य स्वरूप आणि त्याच्या सभोवतालचे प्रांगण यातील सुसंतुलित रचनेमुळे मंदिराच्या भव्यतेबद्दलची भावना आपल्या मनात कायम राखली जाते. मूळ आराखड्याप्रमाणे या मंदिराचे गर्भगृह (७५ फूट), पहिले प्रवेशद्वार (६५ फूट) आणि दोन्ही कक्ष (४० फूट), अशा एकूण चार पिरॅमिडल शिखरांनी युक्त असावे असा तज्ज्ञांचा कयास होता. मानवी गजबजाटापासून दूर, एका उंच जोत्यावर उभी करून पिरॅमिडल शिखराद्वारे पूर्णत्वाला नेलेल्या, ठळक त्रिदलीय कमानी, भव्य भिंती आणि मोहक तोरण असलेल्या, पार्श्वभूमीवरील पीरपंजाल पर्वतरांगाचे वैभव एकांतात पाहत आहेत असे भासणाऱ्या या मंदिराच्या सर्वांगीण देखणेपणाची वर्तमानकाळात मात्र आपण फक्त कल्पनाच करू शकतो!

चौदाव्या - पंधराव्या शतकात सूफी उपदेशक मीर मुहम्मद हमदानी यांच्या सल्ल्यानुसार 'बुतशिकन' सुलतान सिकंदर शाह मिरी आणि त्याचे मुख्य वकील नवधर्मांतरित ब्राह्मण सुहभट्ट यांनी या सुंदर मंदिराचा विध्वंस केला असे मानले जाते. जुन्या संदर्भातील तसेच तिथे भेटलेल्या 'संशोधक - कम -गाईड' ने दिलेल्या माहितीनुसार मंदिराच्या आत लाकडे जाळून ते नष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला. कदाचित हेच सद्यस्थितीतील मंदिराच्या लाकडी पिरॅमिडल शिखरांच्या अभावाचे कारण असावे. काश्मीर प्रदेशाचे इस्लामीकरण करण्याची व्यापक रणनीती या विध्वंसामागे होती. एकेकाळी हिंदू वारसा आणि स्थापत्य कलेतील उत्कृष्टतेचा पुरावा म्हणून उभे असलेले हे मंदिर धार्मिक आणि सांस्कृतिक उलथापालथीचे प्रतीक बनले. या विनाशाचा परिणाम मंदिराच्या भौतिक नुकसानापर्यंत मर्यादित न राहता स्थानिक हिंदू समुदायावरसुद्धा त्याचा लक्षणीय परिणाम झाला. स्थानिक हिंदूंच्या तीव्र छळामुळे धार्मिक भेदभावाची व्याप्ती वाढली. परंतु एवढ्या दुःखद प्रसंगाचा साक्षीदार असलेल्या मार्तंड सूर्य मंदिराचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व अनेक शतकांनंतरही कायम आहे. काश्मीरी पंडितांसाठी सर्वात पवित्र तीर्थक्षेत्रांपैकी एक म्हणून ते आजही पूजनीय आहे. या प्रदेशातील धार्मिक आणि राजकीय शक्तींच्या जटिल परस्पर संवादाला प्रतिबिंबित करणारा या मंदिराचा वारसा काश्मीरच्या इतिहासातील एक मार्मिक अध्याय आहे. आधीच उध्वस्त असलेल्या मार्तंड मंदिराच्या अवशेषांचे तीव्र हवामान आणि भूकंपामुळे अजूनच नुकसान झाले तरी आता भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत त्याच्या पुनरुत्थानाचे कार्य सुरू आहे आणि पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सभोवताली फुलझाडे व हिरवळीने युक्त असे उद्यानही विकसित केले आहे.



या देवालयाची संपूर्ण रचना, दैवी शक्तींनी जणू दगडांत आरेखन केलेले उत्तुंग स्वप्न पाहिले आणि जवाहिऱ्यांनी दागिने घडविण्याच्या नजाकतीने ते साकार केले, अशा दर्जाची आहे. म्हणूनच तर त्याची भुरळ हिंदी चित्रपटसृष्टीतील मंडळींनाच काय जगभरातील सर्वच पर्यटकांना पडते! अंत:करणात वेदना घेऊन या भग्न परिसरात हिंडताना 'भव्य' मार्तंड मंदिराचे 'दिव्यत्व' सुद्धा आपल्या आत्म्याला खोलवर स्पर्शून जाते, यात शंकाच नाही. सर्वव्यापी सूर्याला शोभेशा या मंदिराचे दर्शन घेतल्यावर काश्मीर ट्रीप आणि जिंदगी बद्दलही आता 'कोई शिकवा' राहणार नव्हता, याचे मला मनोमन समाधान वाटले!

**टीप** - मट्टन गावात 'श्री मार्तंडतीर्थ ट्रस्ट' ने उभारलेला सूर्य, श्रीशिव-पार्वती, श्रीगणेश, दुर्गादेवी, श्रीराम या देवतांच्या मंदिरांचा समूह आहे. अधिक महिन्यात (मलमास) पितरांना तर्पण करण्याचे या स्थानाचे महत्त्व आहे. प्रस्तुत लेखातील 'विमला' आणि 'कमला' या दोन पवित्र झऱ्यांची दंतकथा हेच स्थान निर्देशित करते. मार्तंड सूर्य मंदिरापेक्षा इथेच भाविकांची जास्त गर्दी आढळते!

संदर्भ -


1) A. Cunningham (1848) - An Essay on the Arian Order of Architecture, As Exhibited in the Temples of Kashmir, Baptist Mission Press, Circular Road, Culcutta, India

2) H. H. Cole (1869) - Illustrations of Ancient Buildings in Kashmir for Archaeological Survey of India, London, England

3) E. B. Havell (1913) - Indian Architecture, John Murray, -lbemarle Street, London, England

4) Rai Sahib Daya Ram Sahni (1918) - Pre Muhammadan Monuments of Kashmir, Archaeological Survey of India, Annual Report 1915 - 16, (edited by Sir John Marshall), Calcutta, India

5) R. C. Kak (1933) - Ancient Monuments of Kashmir, The India Society, London, England

6) P. A. Koul (1935) - Archaeological Remains in Kashmir, The Mercantile Press, Lahore, India

7) Percy Brown (1959) - Indian Architecture (Buddhist and Hindu Periods), Fourth Edition, D. B. Taraporevala Sons Co. Private Ltd., Bombay,India

8) P.N.K. Bamzai (2007) - Culture and Political History of Kashmir, p 224,Gulshan books,Srinagar,India

9) Daily Excelsior (June 30,2013) -Ancient Shrine of Martand

10) S. Mohd (2017) - Intl. J. Sci.Res. Publ., Vol. 7,p742-748

11) U. Riyaz (2020) - Heritage: J.Multidiscipl. Studies Archaeol., Vol. 8, p 973 - 984

12) S.A. Lone (2024) - Intl. J. Res. Publ. Rev., Vol. 5 (2), p 1471-1474

13) Wikipedia - Kashyapa

१४) श्री प्रताप सिंह संग्रहालय, श्रीनगर, जम्मू काश्मीर सरकार (माहिती व छायाचित्र)

१५) भारतीय पुरातत्व विभागातर्फे उभारण्यात आलेला माहिती फलक


⌘⌘⌘


**संपर्क :** ३०६, डॅफोडिल, नीलकंठ गार्डन, गोवंडी(पूर्व) मुंबई ४०००८८ **भ्रमणध्वनी :** ९८६९०५१८१९



## 'भावे-प्रयोग'मध्ये द्यायच्या जाहिरातींचे दर

पाव पान रु. ५,००/- अर्धे पान रु. १,०००/- पूर्ण पान रु २,०००/-
संपूर्ण अंक प्रायोजकत्त्वाचे रु. १०,०००/-
रंगीत आवृत्तीचे दर दुप्पट राहतील.

आपल्या व्यवसायाची जाहिरात भावे-प्रयोगमध्ये जरूर द्यावी ही विनंती.

# मोबाईल व सिक्युरिटी

© जयंत विष्णु भावे, पुणे.

पूर्वीच्या काळी फेसबुक, बँकिंग, ई-मेल इत्यादी ॲप्लिकेशन्स डेस्कटॉप किंवा लॅपटॉप वरून वापरले जायचे आणि हा डेस्कटॉप किंवा लॅपटॉप तुमच्या घरात अथवा ऑफिसमध्ये असायचा. तेव्हा तुमच्या कॉम्प्युटरला एक Physical security असायची.

सध्या बहुतेक जण आपापली बँक, ई-मेल, फोन पे, Paytm, फेसबुक इत्यादी ॲप्लिकेशन्स स्वत:च्या मोबाईल फोनमध्ये ठेवून हिंडत असतात. कॉम्प्युटरच आता तुमच्या हातात आला आहे. तुमचा फोन जर कुणाच्या हाती लागला तर तो तुमचे बँक अकाउंट रिकामे करू शकतो. हे होऊ नये म्हणून खाली दिलेल्या गोष्टी करा -

१) तुमचा फोन अनलॉक करण्यासाठी स्ट्राँग पासकोड ठेवा. पासकोड १२३४ असा साधा किंवा तुमचा जन्म दिनांक असू नये. स्वत:बद्दलचा डेटा उदाहरणार्थ जन्म दिन, तुम्ही काम करीत असलेल्या कंपनीचे नाव, तुमचा फोटो, तुमचा पत्ता इत्यादी तुम्ही स्वत:च निरनिराळ्या ॲप्स आणि वेब साईटसला दिलेला असतो आणि तो डेटा हॅकर्स सहज प्राप्त करू शकतात. तुम्ही स्वत:च्या नावाचे गुगल सर्च करून बघा. तुम्ही आवाक होऊन जाल स्वत: बद्दलचा सर्च रिझल्ट बघून.

फोन वर बायोमेट्रिक लॉकची सोय असेल तर तिचा वापर करा.

२) टु फॅक्टर (स्टेप) वेरिफिकेशनचा वापर करा. असे केल्याने नियमितपणे तुम्हाला Whats app ओपन करायला PIN वापरावा लागेल. तसेच तुमचा Whats app किंवा इतर ॲप्स hack होण्याची शक्यता कमी होते. कारण टु स्टेप वेरिफिकेशन मुळे एखाद्याने जर दुसऱ्या फोनवर Whats app रजिस्टर करायचा प्रयत्न केला तर त्याला टु स्टेप वेरिफिकेशन PIN द्यावा लागेल आणि तो तुमचा Whats app वापरू शकणार नाही.

३) तुमच्या Mobile फोनचं सॉफ्टवेअर अद्ययावत ठेवा. बरेच जण आळसामुळे Software update नोटिफिकेशन आलेले असताना देखील Update करीत नाहीत. हे Software updates प्रामुख्याने Security patches असतात.

४) ॲप्स हे कुठल्याही वेबसाईट लिंक वरून डाऊनलोड करू नका. ते प्ले स्टोर किंवा App स्टोर वरूनच डाऊनलोड करा. तसेच ॲपच्या नावाची खात्री करून घ्या.

५) ॲप परमिशनचे नियमितपणे पुनरावलोकन (पडताळणी) करा. त्याच परवानग्या द्या ज्यांची त्या ॲपला आवश्यकता आहे. उदाहरणार्थ ट्रु कॉलर ॲपला एस.एम.एस.ची परवानगी देणे गरजेचे नाही.

६) चिनी फोन वापरू नका. ह्यांचा भरोसा नाही.

७) कधीही तुमच्या क्रेडिट कार्डची माहिती ॲपवर स्टोर करून ठेवू नका. प्रत्येक वेळा हा डेटा एंटर करायची सवय लावून घ्या. तसेच पासवर्डस देखील Save करू नका.

८) Find my Phone सारखे Feature वापरा. ह्या Feature द्वारे तुमचा फोन हरवल्यास तो तुमच्या कडील दुसऱ्या Device ने लॉक करता येतो.

९) UPI ॲप्सद्वारे पैसे घेताना PIN टाकायची आवश्यकता नसते. ती फक्त देताना असते. कुणी तुम्हाला पैसे देत असेल आणि देताना PIN मागत असेल तर लगेच सावध व्हा. PIN शेअर करू नका.

१०) कुणी तुम्हाला फोन करून PIN पाठवा, नाही तर तुमचा अकाउंट बंद करतो, वीज तोडतो, पैसे भरा असे म्हणत असेल तर त्याला अजिबात भीक घालू नका. PIN देऊ नका.

११) मित्रांसोबत Netflix, ॲमेझॉन प्राईम इत्यादींचे पासवर्ड Share करू नका. कारण तुमचा मित्र त्याच्या जवळच्या मित्राला ते Share करेल आणि लवकरच तुमचा पासवर्ड अख्ख्या जगाला माहित होऊन जाईल.

१२) स्वत:चं स्टेटस (फोटो इत्यादी) उदाहरणार्थ मी आज इथे आहे आणि उद्या तिथे आहे असे जगाला सतत सोशल मीडियावर (फेसबुक इत्यादी) सांगू नका. तुमच्या मागावर असलेला कुणीही ह्या लाइव्ह स्टेटसचा दुरूपयोग करू शकतो.

१३) आवश्यकता नसताना ॲपला लोकेशन ट्रॅकिंगची अनुमती देऊ नका.

१४) ऊठ सुट ॲपला नोटिफिकेशन पाठविण्याची अनुमती देऊ नका.

१५) मोबाइलला डोक्याजवळ ठेवून चार्ज करू नका. आजकाल बरीच जणं टपरीवरून हलक्या प्रतीची बॅटरी टाकून घेतात. अशा बॅटरीज फुटण्याचा धोका असतो.

१६) तुमच्याजवळ २ बँक अकाऊंट नंबर्स असावेत. एक प्रायमरी आणि दुसरा सेकंडरी. सेकंडरी अकाऊंटमध्ये कमी पैसे ठेवावेत. सगळे UPI ॲप्स हे सेकंडरी बँक अकाऊंटला जोडावेत म्हणजे तुमचा फोन हॅक झाल्यास नुकसान कमीत कमी (Limit Your Losses) होईल. ह्याला Tactical security म्हणतात.

इतकी सगळी काळजी घेऊन देखील समजा तुमचा फोन चोरीला गेलाच तर पोलीसामध्ये FIR दाखल करा. अशा वेळी बिलाची मूळ प्रत आवश्यक असते. ती जपून ठेवा. फोनचा IMEI नंबर लिहून ठेवा. IMEI नंबर हा प्रत्येक फोनचा युनिक असतो.

आपल्याकडे असलेल्या मोबाईलच्या संदर्भात मोबाईल कंपन्यांकडून हल्ली एक संदेश प्रसारित केला जात आहे की अनोळखी नंबरवरून कॉल आल्यास तो कॉल घेऊ नका. खरचंच असे सगळे अनोळखी नंबर्स आपल्याला धोका देतात का? तर नाही. काही नंबर्स आपल्याकडे सेव्ह केलेले नसले तरीही ते आपल्या उपयोगाचे असू शकतात. जर असा कॉल आपण घेतल्यास त्यातील संभाषण ऐकून आपण हे ठरवू शकतो की याचा आपल्याला काय उपयोग झाला.

जर असा कॉल आपल्याला अमुक एक नंबर प्रेस करा किंवा लिंकवर जाऊन माहिती भरा असे सांगत असेल तर तो कॉल आपण कट करून तो नंबर ब्लॉक करावा कारण असा कॉलर तुम्हाला नक्कीच फसवणूकीच्या एखाद्या जाळ्यात अडकवू शकतो.

आपण Whats app वापरत असाल तर ग्रुपवर किंवा वैयक्तिक मेसेज आला की एखाद्या प्रसिद्ध कंपनीच्या फ्री स्कीमसाठी लिंकवर क्लिक करा, असा मेसेज फसवाच असतो कारण अशा प्रसिद्ध कंपन्या कधीही अशा स्किम सोशल मिडियाद्वारे जाहीर करीत नाहीत.

आपल्या हातातला मोबाईल हा नावाप्रमाणेच स्मार्ट झाल्यामुळे आपणही तसेच स्मार्ट व्हायला हवे.

⌘⌘⌘

संपर्क : १, प्लॉट नं ८, श्री तन्मय सोसायटी,
कोथरुड, पुणे ४११०३८ भ्रमणध्वनी : ९८२३५९१९६९

## मोतीबिंदु

**© डॉ. अरुंधती सुधीर भावे, नागपूर.**

मोतीबिंदु ही बाब खूप कॉमन झाली आहे. कुणालाही कुठल्याही वयात मोतीबिंदु होऊ शकतो, अगदी तान्ह्या बाळालासुद्धा मोतीबिंदु होऊ शकतो. म्हणूनच जगात अंधत्वाच्या यादीत मोतीबिंदु प्रथम क्रमांकावर आहे.


दररोज मोतीबिंदुची लाखो ऑपरेशन्स होतात. नवीन उपकरणे आधुनिक शस्त्रक्रिया, आधुनिक लेन्समुळे डोळ्यांच्या आतील मोतीबिंदुची शस्त्रक्रिया फार सुलभ झाली आहे. मोतीबिंदुच्या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला काहीही त्रास होत नाही. रुग्ण लगेच बरा होतो व स्वत:च्या कामावरही लवकर रुजु होऊ शकतो.

**डोळ्यांची रचना कशी असते ते बघू.**

आपला डोळा समोरून गोलाकार असतो. तो हाडाच्या खोबणीत पक्का बसलेला असतो. डोळ्यांच्या काळ्या भागावर एक पारदर्शक आवरण असते. ह्या आवरणातून डोळ्यांच्या आत प्रकाश किरणे परावर्तित होतात. काळ्या पडद्याच्या मागे पारदर्शक प्रथिनांपासून बनलेले काचेसमान आवरण असतं. बाहेरची प्रकाश किरणे ह्या दोन आवरणांमधून परावर्तित होऊन थेट आतल्या पडद्यावर स्थिर होतात. मग मेंदूला संवेदना प्राप्त होते व आपल्याला समोरची वस्तू दिसते.

प्रथिने जोवर पारदर्शक असतात तोवर प्रकाश किरणे आतल्या पडद्यावर स्थिरावतात. काही कारणास्तव ही प्रथिने जेव्हा Insoluble होतात तेव्हा त्याचा रंग पिवळसर गडद व्हायला लागतो. त्यामुळे प्रकाश किरणे आतल्या पडद्यावर नीट उमटत नाहीत. माणसाला अंधुक दिसायला लागतं. ह्यालाच मोतीबिंदु म्हणतात. त्या आवरणाचा रंग पांढरट पिवळसर असल्यामुळे तो मोत्यासारखा दिसतो म्हणून त्याला मोतीबिंदु किंवा मोतीया म्हणतात.

मोतीबिंदुच्या शस्त्रक्रियेत मोतीबिंदुचे आवरण कोरून काढले जाते मशीनद्वारे




आतला गर व बी चर्न केले जाते आणि मशीनद्वारेच धुवून काढले जाते.आवरण पारदर्शक असल्यामुळे ते तसेच ठेवले जाते. त्याच आवरणाचा आधार घेऊन पारदर्शक काच मोतीबिंदुच्या मूळ जागी बसवतात. कृत्रीम पारदर्शक काच मूळ जागी बसवल्यामुळे बाहेरील प्रकाश किरणे पुन्हा थेट आतल्या पडद्यावर स्थिर होतात आणि परत स्वच्छ दिसायला लागतं. मोतीबिंदुमुळे गेलेली दृष्टी पुन्हा परत येते.

या ऑपरेशनसाठी आतील पडद्याच्या व्याधी नसाव्यात. ज्यांना मधुमेह, बी.पी.चा आजार किंवा वयोमानानुसार पडद्यावर परिणाम झाला असेल तर शस्त्रक्रियेनंतर तेवढी दृष्टी येऊ शकत नाही. त्याची सूचना डॉक्टर शस्त्रक्रियेपूर्वीच देतात. **या संदर्भात काही शंका असतील तर डॉ. अरुंधती भावे यांना** Whats app **मेसेज करून विचाराव्यात. खाली दिलेला त्यांचा नंबर** Whats app **चा आहे.**


**संपर्क :** १८३, शास्त्री लेआऊट, सोमलवार हायस्कूलसमोर, खामला, नागपूर ४४००२५ **भ्रमणध्वनी** – ९८२३०११८७७



**शर्व सुमेध भावे, मुंबई** केंद्र सरकारची ICSE बोर्डाची दहावीची परीक्षा ९९% मार्कांसह उत्तीर्ण झाला. देशात त्याचा पाचवा क्रमांक आला. तो मुंबईच्या पार्ले टिळक विद्यालयात शिकत होता. तो शाळेत पहिला आला. त्याला सायकलिंग, ट्रेकिंग, बुद्धिबळ व बॅडमिंटनची आवड आहे. तो मुंबईच्या सौ.अश्विनी व सुमेध भावे यांचा मुलगा व पुण्यातील आनंद वामन भावे व सौ. विनया आनंद भावे यांचा नातू आहे.

**भावे मित्र मंडळातर्फे त्याचे हार्दिक अभिनंदन!!!**





उज्जैन स्थित नायकजी भावे (शिंदे स्टेट ग्वालियर) यांच्या श्री लक्ष्मी जनार्दन मंदीर, सराफा, उज्जैनच्या मूर्ती स्थापनेचा दिवस, वैशाख शुद्ध द्वादशी, मूर्ती स्थापनेच्या दिवसाचा सोहळा दि. ९ मे २०२५ ला सर्व भावे कुटुंबीय व भक्त जनांच्या उपस्थितीत साजरा झाला. या कार्यक्रमाला उज्जैन व इंदूर स्थित प्रमोद मोरेश्वर भावे, अजय प्रभाकर भावे, विश्वास वासुदेव भावे, नकुल सदाशिव भावे इत्यादी सुमारे चाळीस बांधव, कुटुंबीय उपस्थित होते. शिवाय अन्य भक्तजनही उपस्थित होते.

### अंकाबद्दल प्रतिक्रिया

नमस्कार, मे २०२५, अंकातील डॉक्टर सरिता भावे, यांचे दोन लेख वाचले. खूपच छान आहेत, सोबत छायाचित्र आहेत, त्यामुळे बघण्याचा आनंद मिळाला. आम्ही भावे कुटुंबीय गेल्यावर्षी मे महिन्यात आदि शंकराचार्य मंदिर बघून आलो, त्याची माहिती वाचून पुन:प्रत्ययाचा आनंद झाला. तसेच बाओबाव वृक्षांची माहिती खूपच आवडली. त्यांचे या अंकातील सर्व लेख वाचनीय, माहितीपूर्ण असतात. त्यांना धन्यवाद आणि शुभेच्छा.

**कविता भावे, जोगेश्वरी, मुंबई.**

# झाडांच्या बियांपासून तयार केलेले नाविन्यपूर्ण दागिने

©आनंद श्रीकृष्ण भावे, मुंबई.

**झा**डांच्या बिया हे निसर्गाचं विलक्षण रूप आहे.

वडाचं बी हातावर ठेवलं तर दिसत सुद्धा नाही. पूर्ण वाढ झालेला वटवृक्ष जेवढा वर अफाट पसरलेला दिसतो तितकाच तो जमिनीखाली ही पसरलेला असतो. अनेक एकरांमध्ये पसरलेला एक वटवृक्ष कलकत्त्याच्या रॉयल बोटॅनिकल गार्डनमध्ये आहे.

एका छोट्याशा दाण्यामध्ये निसर्ग एका मोठ्या विशाल वृक्षाला सूक्ष्म प्रारूप देतो. योग्य वातावरण मिळाल्यास हे बी गगनाला गवसणी घालण्यास सिद्ध होते आणि कामाला लागते.

पावसाळ्यामध्ये या बियांना नवसृजनाचे स्वप्न पडते व अवघी चराचरसृष्टी नेत्रसुखद हिरवाई पांघरून पाऊसथेंबांना अलगद घेऊन मिरवू लागते.

दागिने घालून मिरवणे स्त्रियांचा स्थायीभाव आहे.

या दागिन्यांमध्ये बिया आल्या तर सहजपणे निसर्गभान सांभाळत हा निसर्गाचा आविष्कार घालणाऱ्याला व पाहणाऱ्याला खचितच मोठा आनंद देतात यात शंका नाही.

वनवासामध्ये सीता कानामध्ये फुलं कानातील अलंकार म्हणून वापरत होती याचे हृद्य उल्लेख रामायणामध्ये आहेत. फळे अलंकारासारखी सजवून श्री गणेशाचे आगमन करायची गोव्याची प्रथाही भारी सुंदर.



कमळाच्या बी वर गुंजेचा नखरा

मालकांगणी ही बुद्धीवर्धन करणारी वनस्पती हिच्या फळांचा लालसर छटांचा साज धुम्रवर्ण मंगलमूर्तीच्या कानात बहारदार दिसतो.

गुंज, रतनगुंज चटक लाल रंगाच्या असतात. गुंजा विषारी पण पानात घालायची हरीपत्ती याच्या वेलीची सुमधुर चवीची पाने वापरतात.

दागिने घडवताना या गुंजांच्या अजून प्रजाती मिळाल्या. काळसर रंगाच्या व पांढऱ्या व काहीशा पिवळ्या छटांच्या. रतनगुंजा व गुंजा भोक पडायला थोड्या कठीण असतात. पण यालाही उपाय सापडला. दक्षिण मुंबईच्या चोर बाजारामध्ये जुनी डेंटिस्ट व सर्जिकल टूल्स शोधून आणून त्याचाही वापर केल्याने अवघड काम सुसह्य झाले. त्यामुळे उत्तम काम देणाऱ्या विविध प्रकारच्या पकडी, चिमटे विविध प्रकारचे वाईज पाहण्यात आले व घेतही गेलो. या हत्यारांच्या संग्रहाला विविध प्रकारच्या ड्रिलिंग मशीन यांचाही साज चढलेला आहे.



लाल गुंजांवर काळा साज त्यावर लव पफ किंवा बलून व्हाईनच्या बदाम ल्यालेल्या बिया

बियांचे काठिण्य त्यांना लावण्यही प्रदान करतं. सागर गोटा, रीठा, नारळाची करवंटी यांना गोल छिद्रे पाडणे त्यापासून कड्या बनवणे ही कारागिरी करतानाची धमाल असते ती बरेच काही शिकवत असते.

बियांचे कानातले करताना मूग, मोहरी, पारिजातकाच्या बिया, तर आहेतच पण एरंड बिया मनमोहक व सुंदर असतात.

कानातले दागिने बनवताना मुंबईतील अनेक जागी असलेल्या इमिटेशन ज्वेलरी बाजारांचाही शोध लागत गेला. मुंबादेवी देवळाजवळ हत्यारे, भुलेश्वर, कुंभारवाडा येथील तसेच मालाड पश्चिमेला असणाऱ्या विविध दुकानांचा शोध लागला. तेथे केवळ आणि केवळ तांबे व पितळ या धातूंच्या तसेच इमिटेशन ज्वेलरी बनवताना लागणाऱ्या हलक्या मिश्रधातूंच्या पूरक वस्तूंची मोठी मोठी दुकाने आहेत. इमिटेशन मार्केट मधील लक्षावधी उपयुक्त वस्तू व त्यातही विविध नाना प्रकार.



पारिजातकाच्या बियांवर मुरुड शेंगेची कापून लावलेली फुले.

एखादं दुकानही नीट पाहायला अनेक तास लागू शकतात.

विविध धातूंच्या तारा उदाहरणार्थ तांबे पितळ कोटेड अल्युमिनियम वायर्स आणून त्यांचा व बियांचा मिलाफ घडवत दागिने बनवणे याची मजाच काही वेगळी.

मुरुड शेंग आपण लहानपणी आजीच्या बटव्याच्या बाळगुटीत पहात आलो आहोत. त्यांना न तोडता वाईज मध्ये त्या अलगद पकडत त्यांचे सेक्शन्स काढून त्या वापरून दागिने घडवत गेलो. अंगभूत पिळ असलेल्या या बियांपासून फुलांच्या आकारातील कापलेले भाग कर्ण फुले होऊ लागली.

मध्य अमेरिकेत आढळणारी कीटक भक्षी वनस्पती आहे विंचू, काकनाशी... विंचवाच्या दोन नांग्या या अग्रभागी असतात. गुंज व या बियांपासून सुंदर घुबडे बनवली. बियांपासून आमच्या घडवलेल्या दागिन्यांमध्ये ही घुबडे लोकप्रियतेत अग्रस्थानी आहेत.

विविध बियांचे कॉम्बिनेशन व ते साध्य करण्यासाठी केलेली वायर्स तारा यांची जंत्री हा मोठा शिकायचा भाग आहे.

अतिशय कडक असणाऱ्या गुलमोहराच्या बिया, तर अंगभूत छिद्र घेऊन आलेल्या वैजयंतीच्या बिया. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या गळ्यात या वैजयंतीच्या बियांच्या माळा असतात. आमच्या कानातील घालायच्या कुड्याही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

रतनगुंजा व त्याच्या बाजूला लावलेले ज्वारीचे दाणे खऱ्याखुऱ्या माणिक व मोत्यांच्या कर्णभूषणांना मोठी टक्कर देते... खरं सांगतो तुम्हाला... लोकांना ज्वारीचे दागिने ओळखू येत नाहीत.



ज्वारीचे दाणे मोती होऊन रतनगुंजे भोवती फेर धरताना

गडद तपकिरी राजमा व लखलखती लाल



रीठा काळा कुळकुळीत सागरगोटा राखी तुकतुकीत

रतनगुंज.

निलगिरीच्या फळांवरील शंकूच्या आकृतीचे आवरण काळी व भडक तांबडी गुंज.

राखी रंगाचे चमकदार सागर गोटे व त्यांना बांधणारी तांब्याची तारेची जिरेटोप पद्धतीची रचना.

रिठ्याच्या काळ्या शार बिया, पुत्रंजीवी झाडाच्या बियांचे दोन्ही बाजूला टोकदार होणारे कलश आकृती आकार. पिवळी फुले धारण करणाऱ्या बिट्टीच्या फळांचा लाकडी बाज

पांढऱ्या अभईच्या शेंगा व बियांची भाजी कोकणात करतातच. साध्या पावट्यापेक्षा दहा पट मोठी ही बी स्वच्छ तकतकीत पांढऱ्या रंगाचे आवरण घातलेली असते. या बी मध्येच गुंजेची लाल काळी बी पेरली (Embedded Inlay) असता मनोहर दिसू लागते. ताजमहालातील संगमरवरी भिंतीवर वेगवेगळ्या रंगाच्या इतर दगडांची तर काही ठिकाणी रत्नांची पेरणी (Embedded Inlay) सौंदर्यवर्धन करते.

सौंदर्य सगळ्यांना आवडते व सौंदर्य व कलाकारीचा मिलाप झाला की साध्या वाटणाऱ्या बिया रूप मनोहर दागिने होतात.

अनेक धार्मिक माळा, जपमाळा, मनगटावरील, केसांमध्ये अलंकार घालून देवतेची मूर्ती असते ती श्री शंकराची आणि सुंदर शोभिवंत बी असते ती रुद्राक्षाची. श्री शंकरा बरोबरच श्री दत्तात्रेयांच्या गळ्यामध्ये कानामध्ये मनगटामध्ये बाजूंवर बाजूबंद रुद्राक्षाचे दिसून येतात.

याला अनेक छिद्र असतात आणि त्यांना मुखाची संज्ञा आहे.

अंगभूत छिद्र असलेली अजून एक वैजयंतीसारखी सुंदर बी म्हणजे भातगोटा किंवा न सडलेली तांदुळाची बी. या अंगभूत छिद्रामध्ये केसासारखी बारीक तार अथवा केस ओवता येतो. भाताच्या बियांपासून अनेक रचना आपल्याला करता येतात व त्यापासून कर्णालंकार तर होतातच पण गळ्यात घालण्याचे दागिने ही करता येतात.

बियांना धारण करणाऱ्या तारा विविध पद्धतीने वळवून, वाकवून, गोलाकार रिंग तसेच पाण्याचा थेंब एक सुलट व एक उलट ठेवला असता जा आकृत्या मिळतात त्या पद्धतीने तारा वापरून अनेकविध रचना या बियांना साजेसे रूप देतात. चक्राकार स्पायरल, चक्रव्यूहासारख्या दिसणाऱ्या विरुद्ध वलयांकित अपोझिट स्पायरल्स, चौकोनी स्पायरल अशा नानाविध रचनांमधील बिया सौंदर्याला मिती देतात.



बहावा किंवा अमलतासच्या काळ्याभोर लांबलचक शेंगा कापून त्याच्या चकत्यांमध्ये गुंज मुरुड शेंग व लव पफच्या बियांची सजावट

मण्यांची माळ असावी अशा धातूंच्या सुंदर माळांना बॉल चेन असे म्हणतात. या बॉल चेन वापरून घडविलेले बियांचे दागिने शोभिवंत दिसतातच पण सुंदर प्रकारे सहज हलणारे असल्याने लक्षवेधक असतात.

बियांपासून केलेले हे दागिने अनेक वर्ष टिकतात.



पाण्याच्या संपर्कात आल्यास बिया रुजतात. त्यामुळे वापरणाऱ्यांनी तारतम्य बाळगून या अलंकारांचा व पाण्याचा संपर्क येणार नाही याची काळजी घेतली की झाले.

आपण निसर्गाची लेकरे आहोत निसर्गाने दिले नाही तर आपलं जगणं व्यर्थ ठरेल.

घातलेल्या बियांच्या दागिन्याचं मुख्य मर्म आहे निसर्गाला जाणून घेण्यामध्ये आहे.

परागी भवनातून बिया जन्माला येतात. वारा, मधमाशा, अनेक पक्षी व प्राणी देखील परागीभवनाच्या या यज्ञात सामील असतात. त्यांच्या या सततच्या अखंड कर्तृत्वातून बिया जन्माला येतात.

यांच्या अगोदर जन्माला आलेला फुलातला सुगंध व मकरंद ठेवा निसर्ग भरभरून देत असतो. बियांचे दागिने घालणाऱ्याला हे निसर्गभान यावे यासाठी ही हा छोटासा प्रयत्न आहे.

कमळाच्या बिया, बकुळीच्या, सीताफळाच्या, विशालकाय पर्जन्य वृक्षाच्या, याचबरोबर धाकट्या खसखस, कांचन, नाचणी व कांग याही बिया वापरून कर्णालंकार सिद्ध केले.

पिस्तोक्याच्या बियांमध्ये खोचलेली तांबडी नाचणी शोभायमान होतेच पण स्वर्गीय पारिजातकाच्या गडद बियांभोवती मोहरीच्या बिया फेर धरून नाचल्यावर बहार येतो.



अतिशय छोट्या कांग बियांना (Foxtail millet) अथवा नाचणीच्या बिया टूथपिक सारख्या छोट्या काड्यांना खाचा करून व त्यामध्ये बसवून त्यांचे कोंदण आगळे दिसते.

निसर्गात आढळणाऱ्या अन्य चीज वस्तूंचाही या बियांच्या दागिन्यांमध्ये उपयोग केल्यास दागिन्यांची रया बदलते. खाली पडलेली पोपटाची तसेच अन्य पक्ष्यांची पिसे, समुद्रात मिळणारे शंख, शिंपले, कवड्या, तांदूळ मणी व बियांचे कॉम्बिनेशन सुंदर व पर्यावरण स्नेही होऊ लागते.

पर्यावरणातच सापडणाऱ्या अनेक दगडांचा, स्फटीक, गारगोट्या बियांपासून केलेल्या कर्णालंकारांची मैत्री करू शकतात.

मृदा अलंकार अर्थातच टेराकोटा ज्वेलरी व बियांचे कॉम्बिनेशन मोठा अभ्यासाचा विषय ठरतो.

बियांच्या दागिन्यांचे ही विश्व व त्याची ओळख आता कुठे होऊ लागली आहे.

हा आमचा आगळा व वेगळा उपक्रम आमच्यापुरताच न ठेवता या विषयाच्या कार्यशाळा ही आम्ही घेत असतो. निसर्गरंग तसेच कागदापासून फर्निचर या विषयांसारख्याही याही अत्यंत लोकप्रिय आहेत.

हे विश्व फार प्रचंड व मोठे आहे हे खरं...

**संपर्क :** भाग्यश्री, १२ ए, आनंदनगर,
अंधेरी (पू.) मुंबई ४०००६९ **भ्रमणध्वनी** ९६१९८७९९७६

⌘⌘⌘

# भावे मित्र मंडळ, एक परिवाराचा सदस्यत्त्व आणि स्वनिधीचा उपक्रम.

**'भावे मित्र मंडळ-एक परिवार'** ही संस्था २००६ मध्ये नोंदणीकृत झाली असून संस्थेचे सदस्य होण्यासाठी १८ वर्षांवरील सर्व कौशिक गोत्री चित्पावन भाव्यांनी मंडळाचे सदस्यत्व स्वीकारावे असे आवाहन भावे मित्र मंडळाकडून वेळोवेळी केलेले आहे. याला प्रतिसाद म्हणून अनेकांनी अगदी लहानग्या मुलांसह सदस्यत्व स्वीकारले आहे. **डिसेंबर २०१८ मध्ये उज्जैनला झालेल्या संमेलनातील निर्णयामुळे सदस्यत्त्वाची रक्कम आता एक हजार रुपये झाली आहे.**

जुलै, २००८ मध्ये झालेल्या भावे मित्र मंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत भावे मित्र मंडळाचे कार्य पुढे नेण्यासाठी संस्थेचे सदस्य वाढविणे व स्वनिधी वाढविण्याबाबत खालील निर्णय झाले. १) शिक्षण व तत्सम सहकार्य. २) व्यावसायिक सहकार्य/व्यवसायाकरिता कमी व्याजदरात भांडवल पुरविणे. ३) वैद्यकीय कारणांसाठी सहकार्य, मोठ्या शस्त्रक्रियेसाठी मदत (परत बोलीच्या तत्वावर). ४) आपत्कालीन सहकार्य अशा कारणांसाठी आणि भावे मित्र मंडळाच्या कार्यालयीन व्यवस्थापनासाठी स्वनिधी जमवावा असे ठरले. **प्रत्येक कमावत्या व्यक्तीने रु. ५०००/- स्वनिधीसाठी द्यावेत** असे आवाहन केले गेले. यापेक्षा अधिक रक्कम दिल्यास स्वागतच आहे असेही आवाहन कार्यकारिणीने केले होते. त्यानुसार अनेकांनी स्वनिधीसाठी भरघोस निधी देऊन चांगला प्रतिसाद दिला. अनेकांनी एक रकमी रु.५०००/- देण्यास असमर्थता दर्शवल्याने रक्कम हप्त्याने स्वीकारण्याचीही योजना समोर आली.

भावे मित्र मंडळाचे अध्यक्ष, श्रीवर्धन वामन भावे यांनी प्रत्येक भावे कुटुंबाकडून रु. १०००/-(रु. एक हजार फक्त) वार्षिक वर्गणी दरवर्षी घ्यावी असा प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावाला अभय शंकर भावे यांनी अनुमोदन दिले. कुलबंधूंचे उपलब्ध असलेले संपर्क पाहता तीन हजारांपेक्षा अधिक कमावत्या व्यक्ती आहेत. **या आवाहनास मान देऊन अनेकांनी सदस्यत्त्व स्वीकारले आहे, तसेच स्वनिधीही दिलेला आहे.**

**आपणही सदस्यत्त्वाची रक्कम रुपये एक हजार व वार्षिक वर्गणी रुपये एक हजार देऊ शकता. खाली दिलेल्या बँक अकाऊंटमध्ये रक्कम ट्रान्सफर करावी अशी विनंती आहे.**

**बँकेचे डिटेल्स याप्रमाणे आहेत. Bank Name** - IDBI Bank, **Branch** - Deccan Gymkhana, Pune. **Account Name** - Bhave Mitra Mandal, **Saving A/C Number** - 50210010010723, **IFSC** - IBKL0000502. **रक्कम ट्रान्सफर केल्यावर अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या क्रमांकावर किंवा** bhave1956@gmail.com **या मेलवर संपूर्ण नाव व पत्यासह कळवावे म्हणजे पावती पाठवता येईल.**

# भावे मित्र मंडळाचा एक उपक्रम - भावे शिक्षण निधी

भावे मित्र मंडळाच्या बैठकीत शिक्षण निधीच्या वाढीसंबंधी काय करता येईल याबद्दल नेहमीच विचार विनिमय चालू असतो.

पहिला कुलवृत्तांत सन १९४० मध्ये प्रकाशित झाला. त्यानिमित्ताने जो निधी शिल्लक उरला होता, त्या रकमेचा विनियोग कसा करावा या विचारातून भावे शिक्षण निधीची कल्पना पुढे आली. अनेक कुलबंधूंचे पाठिंब्याने 'भावे शिक्षण निधी'ची स्थापना झाली. जवळजवळ सत्तर वर्षे हे कार्य पहिला कुलवृत्तांतकर्ते गोविंद वासुदेव भावे व त्यांचे सहकारी, पुढे त्यांचे चिरंजीव मधुसूदन गोविंद भावे यांनी चालवले. भावे मित्र मंडळाची स्थापना झाल्यावर २००८ साली भावे शिक्षण निधी हा भावे मित्र मंडळात समाविष्ट झाला. त्यानंतर कामास थोडा वेग आला. आता मंडळाच्या द्वैमासिकातून दरवर्षी निवेदन दिले जाते व भावे कुलोत्पन्न गुणवान विद्यार्थ्यांना पुरस्कार, गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. असे असले तरी अजून मोठ्या प्रमाणात या निधीमध्ये भर पडल्यास, वाढत्या महागाईच्या काळात वाढलेल्या शिक्षण खर्चाची तोंडमिळवणी करणे शक्य होईल.

भावे शिक्षण निधीतून आजवर अनेक विद्यार्थ्यांना मदत मिळाली आहे. ही मदत 'फूल ना फुलाची पाकळी' अशा स्वरूपाची आहे हे मान्य केले तरी विद्यार्थ्यांना त्या त्या वेळी जी मदत झाली आहे त्याबद्दल अनेकांना कृतज्ञता वाटते व ते स्वाभाविकही आहे. ही मदत थोडी असली तरी आपल्या कुलाने प्रेमाने व आपुलकीने दिलेला तो प्रोत्साहनपर आशिर्वाद आहे ही भावना अनेक कुलबंधूंशी बोलताना लक्षात आली.

**ही भावना लक्षात घेता ज्या भावे कुल बंधू भगिनींना अशी मदत अल्पस्वल्पही का असेना, मिळाली आहे त्यांचेसाठी विनंती वजा आवाहन करीत आहोत की आता जे कुलबंधू आर्थिकदृष्ट्या स्थिरावले आहेत त्यांनी 'भावे शिक्षण निधी'स सहाय्य करून हा निधी वाढवण्याचे कामी पुढाकार घ्यावा. एक कल्पना अशी आहे की प्रत्येकाने दरवर्षीची योजना निश्चित करून तशी रक्कम तयार ठेवून ही रक्कम 'भावे शिक्षण निधी'स देणगीचे स्वरूपात द्यावी. आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने, लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने किंवा भावे मित्र मंडळाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्तानेही अशी योजना आपणास तयार करता येईल.**

अर्थात ज्यांनी विद्यार्थीदशेत या निधीतून काही सहाय्य घेतलेले नाही अशांनीही शिक्षण निधीस सहाय्य करण्यासाठी हे निवेदन आहे हे सांगणे नकोच. 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे हा निधी वाढीला लागेल असा विश्वास वाटतो. सर्वांनी मनावर घेतले तर हे काम सोपे होईल. 'केल्याने होत आहे रे ! आधी केलेचि पाहिजे !' अधिक काय लिहावे!

**अध्यक्ष, भावे मित्र मंडळ**

**शिक्षण निधीच्या देणगीची रक्कम आपल्याला बँकेच्या खात्यात डायरेक्ट जमा करता येईल. त्याचा तपशील खाली दिला आहे.**

**Bank Name** - Janata Sahakari Bank, **Branch** - Karve Road, Pune., **Account Name** - Bhave Mitra Mandal (Ek Pariwar) A/C Bhave Shikshan Nidhi, **Saving - A/C Number** - 007220100038846, **IFSC Code** - JSBP0000007

**रक्कम ट्रान्सफर केल्यावर पर्शराम भावे (९४०३५१६८७५) किंवा अभय भावे (९४२२३०६०३३) यांना कळविणे आवश्यक आहे.**

# भाषाप्रभु पुरुषोत्तम भास्कर भावे.

**© मंजिरी मराठे, मुंबई.**

१९३७ फैजपूरचं काँग्रेस अधिवेशन. नेत्यांच्या नावाचे जयजयकार आकाश भेदून जात होते. त्या आवाजात एक तापलेला, तिखट आवाज बेशक विरोधी आरोळ्या देत होता. स्वयंसेवकांनी त्या वृत्तपत्र विक्रेत्याला घेरलं होतं. त्याच्याशी हिसकाहिसकी चालू होती. ठोश्याला ठोसा देण्याच्या पवित्र्यात उभा राहून, गोऱ्या रंगाचा, घाऱ्या, भेदक डोळ्यांचा तो पंचविशीतला नागपुरी तरुण ओरडत होता, 'सावधान - सावधान'. वृत्तपत्रातील लेखकच स्वत: विक्रेता होऊन आपल्या पत्राचा आपणच प्रचार करीत होता. त्या तरुणाचं नाव होतं.. पुरुषोत्तम भास्कर भावे.

'सावधान'मधील शैलीदार लिखाणामुळे वृत्तपत्रसृष्टीत भाव्यांचं नाव झालं. सावधानचे संपादक आणि प्रखर हिंदुत्वनिष्ठ मावकर यांनी त्यांना लिहितं केलं. त्यावेळी ते फक्त २२ वर्षांचे होते. त्यामुळे साप्ताहिक लिखाणाचं काम अंगावर घेण्याची टाळाटाळ करत होते. मावकरांनी त्यांना चक्क एका खोलीत डांबून ठेऊन त्यांच्याकडून पहिला लेख लिहून घेतला. सावधानच्या अस्तापर्यंत भावे लिहीत राहिले. ते सारे लेख 'रक्त आणि अश्रू' या पुस्तकात आहेत. हा संग्रह वाचताना ज्याचं रक्त सळसळून उठणार नाही आणि डोळ्यांत निमिषमात्र का होईना अश्रू दाटणार नाहीत असा वाचक विरळाच. सावधान निघत होतं नागपूरमधून पण ते पुणे, मुंबई सगळीकडे गाजलं ते पु.भा.भाव्यांच्या तेजस्वी लेखणीमुळे.

भावेअण्णांचे जिवलग मित्र पण पक्के काँग्रेसनिष्ठ असलेले महाकवी ग. दि. माडगूळकर लिहितात.. 'ती भाषाच वेगळी होती. ती अक्षरं लेखणीची नव्हतीच. ती वाणी ओठांची नव्हती, ते झणत्कार आतड्याची तात लावलेल्या तिरकमठ्याचे होते. पांढऱ्यावर काळं सगळेच लेखक करतात. पण या लेखकाच्या लेखणीचं टोक उजेडाचं होतं. त्याचं लिहिणं मला मानवत नव्हतं, पण भिडत होतं. पटत नव्हतं पण काहीतरी पेटवत होतं. तोंड भाजलं तरी खावं वाटावं असा अलौकिक गुण त्या लिखाणात होता. भाजलं तरी आलिंगन द्यावं असं काही त्या साहित्यात होतं.'

'सहदेवा थोडा अग्नी आण', 'विमल तुला काय झालं?', 'आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या तर', 'बंगाल एक करपलेलं कुसुम' असे त्यांचे असंख्य लेख अतिशय गाजले.

राजकीय क्षोभामुळे सावधानच्या झालेल्या अस्तानंतर, हिंदूंच्यावतीनं झुंजण्यासाठी भाव्यांनी मुंबईहून 'आदेश' साप्ताहिक काढायला सुरूवात केली. आपल्या लेखणीच्या ठायी असलेलं सारं सत्व आणि सामर्थ्य त्यांनी पणाला लावलं. आपला देश फाळणीच्या कृष्ण छायेत वावरत असताना भाव्यांची लेखणी अंगार ओकत राहिली.

नौखालीत झालेल्या भीषण, भयंकर अत्याचारांनंतर भावेअण्णांनी प्रत्यक्ष नौखालीला जाऊन लिहिली 'नौखालीची डायरी'. भावेअण्णांनी तिथला तो हिंसाचार, ते क्रौर्य शब्दबद्ध केलं. ते वाचताना अंगावर अक्षरश: शहारे येतात, मन थिजून जातं. कित्येकदा तर पुढे वाचवतही नाही. नौखालीतून परतल्यानंतर कित्येक दिवसरात्र ते अस्वस्थ होते, बेचैन होते. आपले नेते म्हणवणाऱ्यांची याबाबतीतील बोटचेपी वृत्ती, थंडपणा त्यांना आणखीच अस्वस्थ करीत होता. पण तिथल्या अत्याचारांच्या कथा त्यांनी जनतेला ऐकविल्या. त्यासाठी दौरे काढले. हिंदुस्थानात हिंदूंनाच वाली नाही या जाणिवेनं ते व्यथित झाले आणि त्यांचं हिंदू जागृतीचं कार्य वाढतच गेलं.

सुखवस्तू घरातले भावे विलक्षण आयुष्य जगले. बालपणी ते अतिशय हूड होते आणि त्यांचे वडील होते जमदग्नीचा अवतार. त्यामुळे त्यांच्या काही चुकांबद्दल वडिलांनी त्यांना घराबाहेर काढलं. भाव्यांचं आयुष्य पूर्णपणे उध्वस्त होईल असे ते चार महिने होते. विनातिकीट, गावोगाव केलेली भटकंती, उपासमार यामुळे भणंग भिकाऱ्यासारखं जगलेल्या त्या आयुष्यानं भावेअण्णांना अनुभवसमृद्ध केलं. त्यांना आलेले अनेक अतर्क्य अनुभवच त्यांच्या लेखनाचे विषय झाले. बालपणी विदर्भात पांढुर्णा, मलकापूर, कुऱ्हेकाकोडे, वाशीम, परतवाडा, अचलपूर असं ठिकठिकाणी भाव्यांचं वास्तव्य झालं. तिथे चालणारी कथा-कीर्तनं, व्याख्यानं आणि इंग्रजी, मराठीचं अफाट वाचन यामुळे त्यांच्यातला साहित्यिक घडत गेला. त्या भागातलं ख्रिश्चन, मुस्लिम धर्माचं प्रसार, प्रचार कार्य, मुस्लिम मित्रांचे, त्यांच्या घरांचे घेतलेले अनुभव, खिलाफत चळवळीनं धरलेला जोर यामुळे त्यांची हिंदुत्वनिष्ठा वाढत गेली. अन्याय, टवाळखोरी त्यांना अजिबात सहन होत नसे. अरे ला का रे करण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्यानुसारच जिथे अन्याय दिसला तिथे त्यांची लेखणी आग ओकत राहिली.

भावेअण्णांच्या घणाघाती लेखणीचं, बेडरपणे झुंज देण्याच्या त्यांच्या वृत्तीचं आणि वकिली चातुर्याचं दर्शन घडलं ते 'आदेश विरुद्ध अत्रे' खटल्यात. आपल्या लेखणीनं अनेकांना धडकी भरविणाऱ्या आचार्य अत्र्यांनी त्यांच्या 'नवयुग' साप्ताहिकातून, भाव्यांचं पूज्य दैवत असणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांवर टीका केली. निरुपायानं भावेअण्णांनी अत्र्यांना त्यांच्याच भाषेत 'आदेश' मधून प्रत्युत्तर दिलं. 'फाल्गुन' या नावानं भावेअण्णांनी केलेल्या लिखाणानं अत्र्यांना सपशेल माघार घ्यावी लागली. त्यामुळे 'आदेश'चं नाव झालं आणि पुरुषोत्तम भास्कर भावे या नावाचा दरारा निर्माण झाला.

भावेअण्णा सौंदर्याचे भोक्ते होते, प्राणी पक्षांवर माया करणारे होते. हळवेही होते. त्यामुळे त्यांच्या साहित्यातही प्रतिभेचे सगळे रंग दिसतात.

भावेअण्णा आणि गदिमा यांचं मैत्र हे विशेष होतं. त्या दोघांचे विचार जसे टोकाचे होते तशीच त्यांची मैत्रीही. त्यामुळे त्या दोघांची पत्रं हाही एक साहित्य विशेष आहे.

महाराणी पद्मिनी, विषकन्या, स्वामिनी अशी नऊ नाटकं, वर्षाव, अकुलिना, दोन भिंती अशा सतरा कादंबऱ्या, एकतीस कथासंग्रह, सौभाग्य, साता जन्माचा सोबती, सांगू कशी मी अशा सहा चित्रपटकथा, उत्तरदिग्विजय, चितोडयात्रा ही रसाळ प्रवास वर्णनं, असंख्य वैचारिक लेख आणि 'प्रथमपुरुषी एकवचनी' हे रसरशीत आत्मकथन अशी त्यांची विपुल ग्रंथसंपदा आहे. ते जसे प्रभावी लेखक होते तसेच प्रभावी वक्तेही होते.

'हंस'च्या १९७३ च्या दिवाळी अंकापासून ते भावेअण्णांच्या निधनापूर्वी जुलै १९८० पर्यंत त्यांचं आत्मवृत्त क्रमश: प्रकाशित होत होतं. हंसचे संपादक आनंद अंतरकर यांनी भावेअण्णांना सगळं लेखन एकदमच पुरं करण्याचं अनेकदा सुचवलं. त्यावर भाव्यांचं ठाम उत्तर असे, 'तसं कोणाचं जीवन जगून पूर्ण होतं? माझे आता फार दिवस राहिलेले नाहीत. माझ्यासाठी दरवाजा उघडलेला आहे. या आत्मकथेच्या शेवटी तुम्हाला अपूर्ण असंच लिहावं लागणार. मी आणि ही आत्मकथा एकाच दिवशी संपणार! म्हणजे मी संपणार आणि ही आत्मकथा अपूर्णच राहणार!!' आणि भाव्यांचे शब्द खरे ठरले. १३ ऑगस्ट १९८० ला भावेअण्णांनी या जगाचा निरोप घेतला.

ईश्वराचं सामर्थ्य, माणसाचं तेज, पुरुषार्थ, पराक्रमाच्या कहाण्या यांनी झपाटून जाणारे भावे. झपाटून जाणं हा भावेअण्णांचा स्वभाव होता आणि झपाटून टाकणं ही त्यांच्या शब्दांची, लेखणीची किमया होती. साहित्याचे विविध रंग हाताळतानाही ते कधी जीवननिष्ठेपासून ढळले नाहीत. किंबहुना त्यांच्या साहित्यातून त्यांची जीवननिष्ठाच व्यक्त झाली. जीवननिष्ठा हीच तर आहे भाषाप्रभु पुरुषोत्तम भास्कर भावे यांची साहित्यिक प्रतिमा.

⌘⌘⌘

**संपर्क :** श्रीनिवास, २९१, वीर सावरकर मार्ग,
दादर (प.) मुंबई ४०००२८ **भ्रमणध्वनी :** ८८७९६५९७६४

## कमलदल

चंद्रशेखर वसंत भावे, पुणे.
मोबाईल ९८५००२७२४०

आगमन : ८ सप्टेंबर, १९३१. प्रस्थान : २६ मे, २०२५.

माझी आई, कमल वसंत भावे, हीचे नुकतच वयाच्या ९४ व्या वर्षी दुख:द निधन झालं. ती एक कर्मयोगीनीच होती. अत्यंत हौशी, कोणत्याही कार्यात पूर्ण सचोटीने सहभागी होत असे. लहानपणी घरची परिस्थिती जरा हालाखीचीच होती. वडील, कै. श्री. श्रीधर भिकाजी मोघे, वारले त्यावेळी ही, भावंडात तिसऱ्या स्थानी असलेली, अंदाजे ११ वर्षाची होती. एकूण तीन भाऊ आणि दोन बहिणी, ही धरून एकूण सहा. कै. श्री. सुमती पुरोहित, ही सर्वात थोरली, तिचे वयाच्या अंदाजे ८६ व्या वर्षी निधन झाले. त्यानंतर श्री. चंद्रकांत श्रीधर मोघे, माझे मामा, आजमितीला ९६ वर्षाचे, हयात आहेत. मग कमल, माझी आई. त्यानंतर कै. वसंत श्रीधर मोघे, यांचे वयाच्या अंदाजे ८२ व्या वर्षी निधन झाले. त्याच्या नंतर माझी दुसरी मावशी, कै. श्री. विमल भाभे, हीच वयाच्या अंदाजे ७७ व्या वर्षी निधन झालं. आणि माझे सर्वात लहान मामा, श्री. विनायक श्रीधर मोघे आता वयाच्या ८४ व्या वर्षात आयुष्याची वाटचाल करत आहेत. सर्वच दीर्घायुषी.



ज्यावेळी हिच्या वडिलांचे निधन झाले त्यावेळी हिचे मामा, कै. श्रीकृष्ण नानल, तात्यामामा, हे कराची येथे एका मुलींच्या शाळेत मुख्याध्यापक म्हणून नोकरीस होते. माझी आजी, कै. श्री. इंदिरा श्रीधर मोघे, हिला त्यावेळी एक आधार म्हणून, तात्यामामांनी (श्री. नानल) कोणाही एकाला एक वर्ष सांभाळण्याची जबाबदारी घेतली. बाकी कोणीच कराची येथे जायला तयार नव्हते, त्यावेळी कमल तयार झाली. कोणा एका, मामांच्या ओळखीच्या व्यक्ती बरोबर, रेल्वेने प्रवास करत कराची येथे पोहोचली. त्या लहान वयातच कोणत्याही प्रसंगाला धीराने तोंड द्यायची तयारी दिसून आली. माझ्या आजीला, म्हणजे तिच्या आईला, मात्र ती वर्षभर कशी राहणार याची चिंता होती. कारण तिची भावजय, म्हणजे मामी जरा खाष्ट स्वभावाची होती. त्यावेळी मामीला मदत म्हणून ही घराची बरीच कामे... साफसफाई, कपडे वाळत घालणे, गाद्या घालणे इ. करत असे. मामांच्याच शाळेत तिने चौथी इयत्ता केली. माझी आई अत्तात्तापर्यंत कराचीच्या आठवणी सांगायची. बंदर रोडवर तिच्या मामांचे घर होते. आजूबाजूला गुजराती-जैन लोकं रहात असत. कांताबेन, सुधाबेन, ललिताबेन अशी नावं तिला आठवत असत. तिच्या शाळेत पारशी टीचर चित्रकला शिकवत तर पंजाबी टीचर संगीत. त्यांनी शिकवलेल्या जयजयवंती, काफी, भूप इ. रागांच्या सुरावटी आणि चीजा पण तिच्या लक्षात राहिल्या होत्या. एका वर्षानी ती परत पुण्याला आली. तो साधारण १९४३-४४ चा सुमार होता. ते त्यावेळी शनिवार पेठेतील तांबे वाड्यात रहात असत. श्री. तांबे हे, सी.एफ.व्ही.डी. (सेन्ट्रल फिल्ड व्हेईकल डेपो, किरकी.) या त्या वेळच्या ब्रिटीश राजवटीतील डिफेन्स डिपार्टमेंटमध्ये सी.एल.ओ. (चीफ लेबर ऑफिसर) होते. त्या वेळी दुसरे महायुध्द संपत आले होते. त्यांनी माझ्या मावशीला, वीस वर्षे पूर्ण झाल्यामुळे, त्या डेपोत नोकरीला लावले. त्या सुमारास माझी आई सोळा वर्षाची होती. मी पण तुझ्या बरोबर नोकरी करणार असा हट्ट धरून ती पण डेपोमध्ये जायची. शेवटी तिला पण कॅज्युअल लेबर म्हणून भरती करून घेतलं. त्यावेळी या बहिणींचा पगार साधारण तीन रुपये (४८ आणे) आणि वाहतूक भत्ता ८ आणे असा होता. त्यावेळी, ब्रिटीशांचे कैदी म्हणून इटालियन फौजेतील उच्च अधिकारी या डेपोचा कारभार सांभाळत! त्यांनी या बहिणींना नाईट स्कूलमध्ये जाऊन शिकलात तरच नोकरी टिकेल असा दम भरला. त्यामुळे या पुण्यात भानुविलास टॉकीजमागे असलेल्या 'आयडियल नाईट स्कूल' मध्ये जाऊन फायनल पर्यंत शिकल्या, ते देखील नोकरी करून. पुढे स्वातंत्र्य मिळाल्यावर माझी आई मस्टर-रोलवर पर्मनंट झाली, साल १९४९.



पुढे जवळपास ४४ वर्ष नोकरी होऊन, शेवटच्या दीड वर्षात, सनदीकृत अधिकारी (Gazetted Officer) म्हणून १९८९ साली निवृत्त झाली. नोकरीत असताना, डेपोतर्फे थ्रो बॉल स्पर्धेत भाग घेतला. तसेच ड्रामा कॉम्पीटीशनमध्ये.... देवमाणूस आणि वाहतो ही दुर्वांची जुडी या नाटकात कामे केली. सर्व भारतभर लष्करी तळ आणि डेपो यांच्याशी पत्रव्यवहार करत असल्याने तेथील लष्करी अधिकारी हिच्या कामाच्या योग्य आणि तत्पर सेवेमुळे अचंबित होत.... लेडी कर्मचारी असून एवढे बारीकसारीक ते महत्त्वाचे मोठे पार्टस याबद्दलची तिची माहिती बघून त्यांना हिचा अत्यंत आदर वाटे. कोणीही लष्करी अधिकारी काही कामानिमित्त पुण्याला डेपोत आले तर 'भावे मॅडम' ना आवर्जून भेटत. सन १९८७ साली भारताचे केंद्रीय संरक्षण मंत्री कृष्ण चंद्र पंत जेव्हा या खडकीच्या डेपोला भेट देण्यास आले तेव्हा डेपोच्या कमांडरनी तेथील स्टोअर्स विभाग दाखवण्याची आणि तेथील माहिती देण्याची जबाबदारी भावे बाईंवर सोपवली आणि माझ्या आईने ती मोठ्या हिकमतीने पार पाडली.

शिवणकामाची आवड असल्याने, हप्त्याने नॉव्हेल शिवणमशीन घेऊन, हौस म्हणून खूप शिवणकाम केलं. यात पोलकी, परकर, बाळंतविडा, उश्यांचे अभ्रे, पडदे इ. खूप शिवणकाम केले. तिला हलव्याचे दागिने करण्याची कला अवगत होती. पुण्यातल्या 'तुळशीबाग' येथून वेगवेगळे रंगीत लोलक, मणी, जिऱ्याचे सर, सोनेरी-चंदेरी कागद इ. वस्तू आणून हलव्याचे दागिने म्हणजे... कंबरपट्टा, वाकी, बांगड्या, तोडे, मुकुट, बिंदी इ. दागिने अगदी रात्री जागून केले. नातेवाईक तसेच वाड्यातील सर्व लग्न झालेल्या मुलींच्या मंगळागौर, डोहाळेजेवण वगैरे कार्यक्रम या हलव्याच्या दागीन्यांशिवाय पार पडत नसत.

अशी ही माझी आई एप्रिल २०२० पासून अंथरुणाला खिळून होती. तिच्या मेंदूच्या डाव्या भागात रक्ताची गुठळी अडकली होती; त्यामुळे डावा हात आणि पाय यांना आदेश मिळत नसत. डॉक्टरांच्या मते त्या वयात तिला ऑपरेशन सहन होणार नाही आणि ते यशस्वी होईल याची खात्री पण देता येत नाही. ती तेव्हापासून पाठीवरच झोपून होती. तिला स्वत:ला कुशीवर देखील वळता येत नसे. पण तिचा काम करण्याचा उत्साह कधीच कमी झाला नाही. मी सकाळी पोळ्या करेन.... डबा घेऊन ऑफिसला जायचे आहे ! साडेसात वाजता बस येते ! हे शेवटपर्यंत चालू होतं...

आमच्या दृष्टीने एकच समाधान आहे की आम्हाला तिची सर्वतोपरी सेवा करण्याचे भाग्य लाभले आणि तिने पण शेवटपर्यंत आम्हाला आधार कायम ठेवला. **हीच आई जन्मोजन्मी मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना. धन्यवाद.**

## संकल्पपूर्ती - छंदातून व्यवसायाकडे या पुस्तकाचे प्रकाशन


डॉ.सुभाष वामन भावे व रश्मी गोडसे यांनी संपादित केलेल्या संकल्पपूर्ती - छंदातून व्यवसायाकडे या सकाळ प्रकाशनातर्फे प्रकाशित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन दि. १३ मे २०२५ ला पुण्यातील निवारा सभागृह येथे ज्येष्ठ अभिनेते अविनाश नारकर यांचे हस्ते झाले. या प्रसंगी सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, अभिनेत्री ऐश्वर्या नारकर, सकाळचे संपादकीय सल्लगार निरंजन आगाशे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन ऋषिकेश गोडसे यांनी केले. डॉ. सुभाष वामन भावे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

ज्ञान हे व्यवहारात वापरता आले पाहिजे. आपल्या कलेचा व छंदाचा उपयोग व्यवसायात करता आला तर आयुष्यात ताण-तणाव, नैराश्य येणार नाही असे डॉ. पराग काळकर यांनी प्रतिपादन केले.

'छंदाच्या माध्यमातून कला जोपासून आयुष्य सशक्त करण्याची ताकद आहे. आजच्या काळात शिक्षण हे सर्वस्व मानून चालणार नाही. छंद जोपासून कौशल्य विकसित करणे फार महत्त्वाचे आहे.' असे विचार अविनाश नारकर यांनी व्यक्त केले. 'छंद तुम्हाला आनंद व पैसा या दोन्ही गोष्टी देतो. या पुस्तकामुळे इतरांना आपला छंद जोपासून त्यातून अर्थार्जनाची प्रेरणा मिळेल.' असे ऐश्वर्या नारकर म्हणाल्या.

## साभार कृतज्ञता

**भावे शिक्षण निधीस १) राजेश शशिकांत भावे मुंबई यांनी कै. शशिकांत भावे व कै.सुजाता भावे यांचे स्मरणार्थ वीस हजार रुपयांची देणगी दिली आहे.**

**भावे मित्र मंडळाच्या स्वनिधीला १) महेश मधुकर भावे, सिकंदराबाद यांनी एक हजार रुपयांची २) देवदत्त भास्कर भावे, इंदूर यांनी एक हजार नऊशे रुपयांची ३) राजेश नारायण भावे, पुणे यांनी पाच हजार रुपयांची ४) डॉ. सरिता विनय भावे, मुंबई यांनी त्यांच्या सासुबाई कै. सुनिता रामचंद्र भावे यांच्या स्मरणार्थ पाच हजार रुपयांची देणगी दिली आहे.**

**१) महेश मधुकर भावे, सिकंदराबाद २) भूषण विलास भावे, तळेगाव दाभाडे यांनी प्रत्येकी एक हजार रुपये भरून ते भावे मित्र मंडळाचे सदस्य झाले आहेत.**

**राजेश नारायण भावे, पुणे यांनी एक हजार रुपयांची वार्षिक वर्गणीची देणगी दिली आहे.**

**भावे मित्र मंडळ सर्वांचे अतिशय आभारी आहे.**

## नवी दिल्ली येथील ब्राह्मण भवनची सुविधा

गुरुजी डॉ. गोविंदजी कुलकर्णी आणि अखिल भारतीय ब्राह्मण संघाचे सदस्य यांनी करोलबाग नवी दिल्ली येथे ३२ खोल्या असलेले ब्राह्मण भवन उघडले आहे, सात्विक भोजनासह. नवी दिल्लीला येणारे सर्व ब्राह्मण खोल्या प्रथम येणाऱ्यास प्रथम सेवा या तत्वावर बुक करू शकतात! खोल्या प्रशस्त आहेत आणि शॉपिंगसाठी मध्यभागी स्थित आहेत. रेल्वे स्टेशन, मेट्रो स्टेशन, विमानतळ आणि संसद इत्यादी जवळ आहे.

दुपारी १२ वाजता चेक इन

**दर** – एका व्यक्तीसाठी रुपये : - ८००/-

व्यक्तीगत खोली रुपये : - १३००/-

डिलक्स खोली रुपये : - १६००/-

सुट खोली रुपये : - २२००/-

पत्ता आणि स्थान खाली दिले आहे

ब्राह्मण भवन ९३८/३, इलाही बक्स रोड, नैवाला, करोलबाग नवी दिल्ली ११०००५

बुकिंगसाठी कॉल करा ७०११८९५१००/९९५३०९०५८४

**टीप** – १. दर्शनीय स्थळे, हवाई तिकिटे, ट्रेन आरक्षण, टॅक्सी सेवा देखील तुमच्या बुकिंगनुसार उपलब्ध आहेत.

२. ब्राह्मणांना प्रथम प्राथमिकता आणि हे दर फक्त ब्राह्मणांसाठी.

Location:https://maps.google.com/?q=28.648920,77.198395

**वर दिलेल्या नंबरवर फोन करून खात्री केलेली आहे.**

© अमृत नंदकुमार भावे, ठाणे.


चारोळी.

**ग.दि. मा..**

**एक होते माडगुळ्याचे ग.दि.मा.**
**काय अलौकिक होती त्यांची प्रतिभा.**
**त्यांच्या काव्याला नव्हती अन्य कशाचीच उपमा**
**त्यांनीच उजळली माडगुळ्याची प्रतिमा.**

**संपर्क :** अ/१३, विश्वजीत सोसायटी, सावरकर मार्ग,
तीन पेट्रोलपंपाजवळ, ठाणे ४००६०२ **भ्रमणध्वनी :** ९९२००१६०७०

## सहवेदना



**शशिकांत भास्कर भावे, रत्नागिरी** यांचे दि.२३-०५-२०२५ रोजी निधन झाले. ते रत्नागिरीच्या माध्यमिक शाळेत शिक्षक होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, कन्या, जावई असा परिवार आहे.

त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

# एक आश्चर्य म्हणून गणल्या गेलेल्या ह्युमन कॉम्प्युटर – शकुंतलादेवी.

**प्रतिनिधी, पुणे –** ४ नोव्हेंबर १९२९ ला बंगलोरमध्ये शकुंतलादेवी यांचा जन्म झाला. त्यांचं कुटुंब म्हणजे पारंपरिक कन्नड ब्राह्मण. पण शकुंतलादेवी यांचे वडील नव्या युगातले, त्यांनी आपल्या भिक्षुकीच्या पारंपरिक व्यवसायाला आणि मंदिरातील परंपरागत पुजारी होण्याला नकार देऊन सर्कसमधील आडवाटेवरची नोकरी धरली.

शकुंतलादेवींचे वडील सर्कसमध्ये काम करत होते. तीन वर्षाच्या शकुंतलाला पत्त्याचे खेळ शिकवताना तिच्या अफाट स्मरणशक्तीचे त्यांना ज्ञान झाले. त्यांनाच शकुंतलादेवींमधील झपाट्याने गुणाकार-भागाकार करण्याची शक्तीची पहिल्यांदा ओळख पटली. सर्कस सोडून ते शकुंतलाचेच रोडशो करू लागले. वयाच्या ६ व्या वर्षी शकुंतलाने म्हैसूर विद्यापीठात आपल्या अंकगणितीय कौशल्याचे प्रदर्शन केले.

शकुंतलादेवी १९४४ मध्ये लंडनला गेल्या. लंडनला गेल्यावर पुढे त्यांनी संपूर्ण जगामध्ये प्रवास केला आणि आपल्या बुद्धिमत्ता आणि गणितीय कौशल्याचे वेगवेगळे चमत्कार दाखवून त्यांनी संपूर्ण जगाला चक्रावून सोडले. १९७६ साली आपल्या अमेरिका दौऱ्यात त्यांनी संगणकापेक्षा अधिक वेगाने आकडेमोड पूर्ण करून त्याची उत्तरे परीक्षकांसमोर अचूक सादर केली.

इ.स. १९७७ मध्ये डल्लास विद्यापीठात शकुंतलादेवींचा मुकाबला तत्कालीन सर्वात जलद कॉम्प्यूटर 'युनिव्हॅक'शी झाला. तेथे शकुंतलादेवींनी एका २०१ अंकी संख्येचे २३ वे मूळ ५० सेकंदात काढले व फळ्यावर लिहिले. हे मूळ काढायला कॉम्प्यूटरला ६२ सेकंद लागले.

१८ जून १९८० मध्ये त्यांना ७६८६३६९७७४८७० आणि २४६५०९९७४५७७९ ह्या दोन संख्या गुणाकारासाठी देण्यात आल्या. हे आकडे लंडनच्या इम्पीरियल कॉलेजच्या संगणक विभागाने निवडलेले होते. शकुंतला देवी यांनी या दोन आकड्यांचा अचूक गुणाकार केवळ २८ सेकंदामध्ये केला व १८९४७६६८१७७९९५४२६४६२७७३७३० हे उत्तर दिले. १३ आकडी दोन संख्यांचा गुणाकार त्यांनी फक्त २८ सेकंदात पूर्ण केला. त्यांच्या याच कामगिरीमुळे त्यांना ह्युमन कॉम्प्युटर म्हणून ओळखले जाऊ लागले आणि शकुंतलादेवी याचं नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसमध्ये विराजमान झाले.

शकुंतलादेवी यांच्या अंगी एक अद्भुत प्रतिभा होती की अख्ख्या भारतास त्याची दखल घ्यावी लागली. गुगलने त्यांच्या पहिल्या जयंतनिमित्त खास कॅलक्युलेटर स्टाईलमध्ये डुडल बनवून त्यांना आदरांजली वाहिली होती.

भारतात परतल्यावर १९८८ मध्ये त्यांना अमेरिकेतून बर्कलेच्या कॅलीफोर्निया विद्यापीठामधील मानसशास्त्र विभागाचे विशेष आमंत्रण आले. या विभागातील प्रा. आर्थर जेनसन यांनी त्यांच्यावर संशोधन करण्यास सुरुवात केली. प्रा. आर्थर जेनसन यांनी देखील त्यांच्यावर असंख्य प्रयोग केले. कोणत्याही अवघड बहुअंकी संख्येच घनमूळ काढणे किवा कोणत्याही बहुअंकी संख्येचा सातवा किवा आठवा घात काढायला सांगण्याची खोटी की शकुंतलादेवी यांचे उत्तर हजर असायचे.

१९६० च्या दशकात त्यांचा परितोष बॅनर्जी यांचेशी विवाह झाला. कोलकात्याचे रहिवासी असलेले परितोष आयएएस होते. या जोडप्याचा १९७९ मध्ये घटस्फोटही झाला. त्यानंतर त्या बेंगलोरला परतल्या. त्यांना अनुपमा बॅनर्जी ही एक मुलगी आहे.

आपल्या गणितीय कौशल्याशिवाय शकुंतलादेवींनी अनेक पुस्तकेही लिहिली आहेत. त्यामध्ये फलज्योतिषासह, पाककला आणि अनेक कादंबऱ्याचाही समावेश आहे. त्यांनी समलैंगिकतेविषयीही एक अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिलंय.

२०१३ सालच्या एप्रिल महिन्यात, वयाच्या ८३ व्या वर्षी बंगलोरमध्ये शकुंतलादेवी यांनी अखेरचा श्वास घेतला आणि हा जगप्रसिद्ध ह्युमन कॉम्प्युटर काळाच्या पडद्याआड झाला.

**महत्त्वाची वैधानिक सूचना –** 'भावे-प्रयोग' या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्याचे सर्व लेखनाधिकार त्या त्या लेखकांकडे आहेत. या अंकातील साहित्य अन्यत्र प्रकाशित करण्यापूर्वी त्या त्या लेखकांकडून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. – संपादक.

**संपादक मंडळ : अभय शंकर भावे, संपादक**
शशिकिशोर दत्तात्रेय भावे, पर्शराम गोविंद भावे,
उदय नारायण भावे. (सल्लागार)

**प्राजक्त**

'प्राजक्त' हे सायंदैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांनी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड कोल्हापूर-४१६००२ येथे छापून प्राजक्त कार्यालय, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६००२ येथून प्रसिध्द केले.
**संपादक : प्रफुल्ल डबीर. फोन : 8623053750**
**email** - prajakaweekly@gmail.com
RNI NO. : **M-6 (1457) / 70-RNI**
**Reg. No. KLR 136/24-26 Posted in Kolhapur RMS**